प्रकरण तिसरे

# 'बळीबा पाटील' कादंबरी

प्रकरण तिसरे

# 'बळीबा पाटील' कादंबरी

**प्रस्तावना :**

प्रस्तुत प्रकरणात कृष्णराव भालेकरांच्या 'बळीबा पाटील' या कादंबरीचा विचार करावयाचा आहे. ही कादंबरी 'दीनमित्र'च्या एप्रिल १९८८ ते जुलै १९८८ च्या क्रमश: प्रसिद्ध झाली असली तरी तिचे लेखन १८७७ साली पूर्ण झाले. कादंबरीचे मूळ शीर्षक 'बळीबा पाटील आणि १८७७ चा दुष्काळ' असे आहे. परंतु १८७७ चा दुष्काळ हा भाग कादंबरीत आलेला नाही.

'बळीबा पाटील' ही कादंबरी एकूण चार भागात विभागलेली आहे. कादंबरीची प्रत्यक्ष सुरूवात बळीबा पाटील याच्या पाटीलकीच्या प्राचीन इतिहासाने होते. त्यानंतर कथानकात कुटाळ गावाची रचना, शेती करण्याची पद्धत, पिके-आहार, राहणीमान, पोशाख, चालीरिती, सण, पाटील-कुलकर्णी संघर्ष ही कादंबरी प्रकट करते. दुसऱ्या भागात बळीबाच्या कुटुंबियांचा परिचय करून दिलेला आहे. तिसऱ्या भागात बळीबाने घेतलेल्या आप्तमित्रमंडळीच्या सभेचे वर्णन आले आहे. धर्म, जात, ईश्वर याविषयी प्रश्नोत्तर स्वरूपाचे विवेचन कादंबरीतून आहे तर चौथ्या भागात बळीबाने आपल्या जीवनाचे सार्थक कसे करावे? या संदर्भात उपदेशपर विवेचन आले आहे. या कादंबरीतील कथानक, व्यक्तिरेखा, निवेदनपद्धती, भाषा इ. घटकांच्या अंगाने कादंबरीचा अभ्यास करावयाचा आहे.

कृष्णराव भालेकर यांची 'बळीबा पाटील' ही कादंबरी प्रसिद्ध आहे. या कादंबरीची निर्मिती व प्रेरणा कादंबरीतील प्रस्तावनेत स्पष्ट झाली आहे. ''शेतकऱ्यांस सहजरित्या मार्ग सुचून आपली सुधारणा करून घेता यावी.''[१] हे प्रयोजन नजरेसमोर ठेवून भालेकरांनी या कादंबरीचे लेखन केले आहे. 'बळीबा' ही कादंबरीची प्रमुख व्यक्तिरेखा आहे. सर्व खेड्यातील लोकांनी एकत्र येऊन आपल्या गावाची व्यवस्था कशा रीतीने ठेवावी याचा उत्कृष्ट आदर्श या कादंबरीतून आपणासमोर उभा केला आहे. या जमिनीचे मूळ मालक

शेतकरी आहेत. हिंदुस्थान हा देश मूळ शेतकऱ्यांचा आहे. या देशावर आर्यांपासून इंग्रजांपर्यंत अनेक परकीयांनी आक्रमण केले. त्याचबरोबर शेतकऱ्यांचे धार्मिक व आर्थिक शोषण करून त्यांनी संपत्ती लुटून नेली. त्यांच्या जमिनी बळकावून, त्यांच्या उत्पन्नात हिस्सेदार होऊन परकीयांनी आपले अधिकार गाजविले. राज्यकर्ते कोण व कोणते आहेत, कोण गेले व आले, आपल्या जमिनीवर ताबा का घेतात, तो कुठे नेतात, त्याचे काय करतात याचे शेतकऱ्याला काडीमात्र ज्ञान नाही. शेतकऱ्यांच्या अधोगतीला महत्त्वाचे कारण आहे. ते म्हणजे अज्ञान होय. म्हणूनच या बलाढ्य समाजावर परक्यांचे ऐषआराम निर्विघ्नपणे चालतात. याचे भान आमच्या शेतकऱ्यांना अद्याप नाही. म्हणून शेतकऱ्यांची अवस्था पशुसारखी झाली आहे. ''शेतकऱ्यास बिया देऊन सुधारण्यापेक्षा सुधारलेल्या लोकांकडून हिंदुस्थानातील शेतकरी सुधारली तर सुधारेल.''[२] सजीव शेतकऱ्यांची सुधारणा होऊ नये, निर्जिव मृत्तिकेची सुधारणा व्हावी या दृष्टिकोनाकडे भालेकरांनी लक्ष वेधले. शेतकऱ्यांच्या दु:खाला 'अज्ञान' व 'दारिद्र्य' हे घटक जबाबदार आहेत. या गुलामगिरीतून, दास्यत्वापासून शेतकऱ्यांची सुटका करून 'शेतकऱ्यास शहाणे' करण्याचा उपाय त्यांनी सुचविला आहे.

शेतकऱ्यांची दु:खस्थिती व त्यावर उपाय सुचविण्यासाठी भालेकरांनी कादंबरी लिहिली. पात्रे, संवाद, प्रसंग, ग्रामीण पार्श्वभूमी वापरून ही कादंबरी लिहिली आहे. या कादंबरीतून शेतकरी, ग्रामीण जीवनाचे वास्तव दर्शन घडविले आहे.

**कथानक**

**भाग १**

कादंबरीच्या सुरुवातीस कपिलापूरच्या पाटीलकीसंबंधी प्राचीन इतिहास आला आहे. बळीबाच्या पाटीलकीवर आजपर्यंत शेजारी-पाजारी झडपा घालीत होते. वडिलांचा विरोध असूनही तो 'कपिलापूर' या गावाचा पाटील झाला होता. बळीबाच्या पाटीलकीला सुरुवात होताच अनेक परकीयांनी हल्ले केले. अरनेकर (आर्य), यवन, मियाँजी, शिबाव, पंजोबा, बाळकोबा व राणोजी हे परकीय लोक आले. आपली सत्ता हस्तगत करून कपिलापूरला लुटले. तेथील लोकांच्यावर अन्याय, अत्याचार व जुलूम केले. शेवटी

बळीबाने 'पाटीलकी मिळावी', अशी राणोजीला विनंती केली आहे. बळीबाच्या विनंतीला मान देऊन राणोजीने परत पाटीलकी दिली. राणोजीने बळीबाला सर्व व्यवस्थित होईल असे आश्वासन दिले. पण बळीबाच्या त्याच्या बोलण्यावर विश्वास नव्हता. आपल्या अज्ञानी, अशिक्षित शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी काहीतरी केले पाहिजे. म्हणून बळीबा शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी रात्रंदिवस झटू लागला.

'कुलकर्णी' हा या गावाचा प्रमुख सूत्रधार होता. एखाद्या फलटणीचा सुभेदार किंवा जनरल लोकांना जसा धाकात ठेवतो तसा हा कुलकर्णी अज्ञान व भोळ्या शेतकऱ्यांना आपल्या जानव्याच्या अधिकाराने वर कलम चतुराईने धाकात ठेवत असे. त्याच्या मर्जीप्रमाणे वागले नाही तर गाव सोडण्याची धमकी देत असे. असा हा कुलकर्णी लोकांना अंमलदारी, सावकारीच्या आणि धर्माच्या नावाखाली पिळवणूक करीत असे. विद्या नसलेल्या पाटलांचा कुलकर्णी खूप गैरफायदा घेत असतात. पण बळीबाच्या रुपाने सुशिक्षित व आदर्श पाटील हा गावाला मिळाल्याने कुलकर्ण्यांचे त्याच्यापुढे काही चालत नव्हते. बळीबा हा 'फारडा कारकून' होता. 'मोरोपंत' म्हणजे कुलकर्णी बळीबाने मोरोपंतास दिमाखात न ठेवता तो त्यास म्हणत असे, तू माझा नोकर आहेस. कोणत्याही कामात जास्त बोलायचे नाही. इतर खेड्यातील अज्ञान व भोळ्या पाटलास धाकात ठेवण्याचा प्रयत्न करशील तसे बळीबापुढे चालणार नाही. बळीबा तसा नांगरमोड्या सहीचा मालक नाही. आता जरी कुलकर्ण्याच्या कामाचा राजीनामा देऊन गेलास तरी मला तुझी गरज नाही. 'बळीबा' हा तीक्ष्ण बुद्धीचा असल्यामुळे मोरोपंताचे कूट कारस्थान ओळखून होता.

बळीबाच्या पाटीलच्या काळात गावामध्ये 'घरफोडे' नावाचा कुलकर्णी राहात होता. त्याला बळीबाने चांगलेच बधाडले. हा कुलकर्णी बळीबाच्या घरात भांडणे लावू लागला. बैल पोळ्याच्या सणादिवशी त्याने बळीबाच्या भाऊबंदामध्ये फूस लावली. कुलकर्ण्याचा आधार मिळताच बळीबाच्या भाऊबंदांनी त्याच्या बैलाला मारण्यास सुरुवात केली. या घडलेल्या प्रसंगाला सामोरे जाण्यासाठी बळीबाचे दहा-बारा दांडगेदुंडगे गडी तयार झाले. ते बळीबाच्या भाऊबंदांवर तुटून पडले व त्यांनी बेदम चोपले. बळीबाच्या गड्यांनी

कुलकर्ण्यांच्या लोकांना पळवून लावले. हा कथानकामध्ये संघर्ष आला आहे. हा संघर्ष दोन वृत्तींमधून आला आहे. बळीबा हा सत्कार्यासाठी वाहून घेणारा आहे. त्यामुळे बळीबांविषयी वाचकांच्या मनात आदर राखला आहे. कादंबरीत ओढून-ताणून कोणतेही प्रसंग निर्माण झालेले नाहीत. हे आपल्याला पुढील प्रसंगावरून लक्षात येते. गावातील काही अज्ञान व भोळ्या शेतकऱ्यांना कर्जाची भीती घालून घडफोडेने त्यांना बळीबास त्रास देण्यास प्रवृत्त केले. बळीबाचे मित्र दीपचंद मारवाडी यालाही मारहाण केली. या सर्व गोष्टींना बळीबाने आळा घातला होता. कुलकर्णी हे धूर्त व मतलबी होते. त्याची चाल बळीबा ओळखून असल्यामुळे कुलकर्ण्यांच्या मोहाला तो बळी पडला नाही. शेवटपर्यंत कुलकर्ण्यांच्यावर दरारा ठेवल्यामुळे बळीबाची पाटीलकी निभावली गेली. सत्यशोधक समाजाने जो मानवी आदर्श घालून दिला आहे त्याचा मूर्तिमंत आविष्कार म्हणजे 'बळीबा पाटील' होय. शेतकरी समाजाचे प्रतिनिधीत्व करणारा आदर्श 'बळीबा पाटील' होय. शेतकरी समाजाचे प्रतिनिधीत्व करणारा आदर्श 'बळीबा पाटील' या कादंबरीतून भालेकरांनी उभा केला आहे.

**कपिलापूरचे वर्णन :**

'बळीबा पाटील' ही कादंबरी एका शेतकऱ्याची व नंतर आदर्श पाटलाच्या जीवनकथेवर आधारीत आहे. कपिलापूर ऊर्फ कुटाळ या गावी 'बळीबा' लहानाचा मोठा झाला. गावच्या रचनेबाबत म्हटले तर कपिलापूरचे शिवार त्रिकोणाकृतीचे मर्यादित होते. गावाच्या पूर्व, पश्चिम व दक्षिण बाजूला 'कपिला' नावाच्या नदीने वेढा दिला आहे. तर गावाच्या उत्तर दिशेला भली मोठी डोंगराची भिंत आहे. अशाप्रकारे निसर्गाचे देणे लाभलेल्या ठिकाणी हे गाव वसले आहे. हे गाव नागवेलीची पाने, बटाटे, केळी आणि रताळे इत्यादींसाठी प्रसिद्ध आहे. जमीन जुमल्याने संपन्न असलेल्या गावामध्ये एकूण ६० मळे होते. गावापासूनच जवळ दोन मैलावर रेल्वे स्टेशन होते. अठरापगड जाती, धर्माचे लोक गावामध्ये राहात होते. या गावाची एकूण लोकसंख्या पंचवीस हजार एकशे सत्तर होती. तसेच गावात कलगी तुरेवाले व दोन-तीन फडवाले होते. याबरोबरच वारकरी संप्रदायाचा प्रभाव असलेली बरीच मंडळी होती.

'कपिलापूर' या गावातील लोकांचे जीवन शेतीवर अवलंबून आहे. त्यामुळे हे शेतकरी मोठ्या कष्टाने शेती पेरतात. त्यांची शेती ही लहरी पावसावर अवलंबून आहे. बऱ्यापैकी लोक मोलमजुरी करून आपली पोटे भरत असतात. शेतकरी ऋतूनुसार पिके घेत असतो. ज्वारी, बाजरी, नाचणी, शाळू, हरभरा व गहू ही पिके घेतली जातात. शेतकरी आपल्या पिकांची चांगल्या प्रकारे निगा राखत असतो. ऊन, पाऊस, जनावरे, पक्षी यांच्या बचावापासून शेतकऱ्याच्या पदरात जे धान्य पडेल त्यावर वर्ष काढावे लागते. वर्षभर शेतात घाम गाळूनही शेतकऱ्यांना सकस अन्न मिळत नाही तर पक्वान्न कोठून मिळणार? असा प्रश्न भालेकरांनी उपस्थित केला आहे. रोजच्या जेवणात कण्या शिजवून ताक दुधाबरोबर खात असत. याशिवाय बाजरी, ज्वारी किंवा नाचणीची भाकरी व दोन-तीन कांदे असा आहार घेत. अशाप्रकारे शेतकऱ्यांच्या वास्तव जगण्याचे वर्णन कादंबरीतून आले आहे.

शेतकऱ्यांच्या कहाणीबरोबर स्त्रियांचेही वर्णन या कादंबरीतून आले आहे. 'एक-दोन रुपयांचे दागिने म्हणजे मोठी मातबरीण बाई' असे समजले जायचे. स्त्रिया घरातील फाटका प्रपंच सांभाळण्यासाठी दिवसभर नवऱ्याबरोबर शेतात राबतात. आपल्या लहान लेकरांना अफूची गोळी देऊन, जे अंगावर पडेल ते काम करत असतात. औत हाकणे, गाडी ओढणे, विहिरीतून मोटा काढणे, गुरे सांभाळणे, ओझी वाहणे अशी कष्टाची कामे स्त्रिया करीत होत्या. शेतकऱ्यांची अज्ञानी, अशिक्षित मुले ही सुद्धा शिदोरी बांधून शेतात जात असत. उन्हातान्हांतून, डोंगरकड्यातून व काट्याकुट्यातून गुरे राखण्यापासूनची सर्व कामे त्यांना करावी लागत. त्यांच्या घरामध्ये तर सगळी लाकडी किंवा खापरी भांडी याशिवाय दुसरे काही पाहायला मिळणार नाही, असे शेतकऱ्यांच्या हलाखी परिस्थितीचे वर्णन केले आहे. छोट्या छोट्या गोष्टींचे वर्णन करून त्या कादंबरीतील भालेकरांनी बारकावे टिपले आहेत.

हे लोक चाली, रीतीरिवाज व रुढी-परंपरेशी चिकटून असतात. सतत कष्ट करत असल्यामुळे या शेतकऱ्यांना सुखाचे दिवस फार कमी असतात. वर्षातून सात ते आठ दिवस आनंदाचे येतात. पोळा, शिराळशेट, शिमगा, दसरा हे सण उत्साहाने साजरे करतात. शेतकरी

आपल्या जनावरांना धुवून त्यांची पूजा करतात. तसेच त्यांची मिरवणूक करतात. आपण मात्र त्या दिवशी पुरणपोळी व गुळवणी खातात. शिराळशेटचा एक मातीचा शिरळोबा तयार करतात. त्याची मिरवणूक काढून त्याला पाण्यात बुडवतात.

या गावातील लोक खूपच अज्ञानी, अशिक्षित व मागासलेले आहेत. परंतु कष्ट करण्यामध्ये ते शहरातील लोकांच्यापुढे असतात. शहरातील वस्ती, सोयीसुविधाच्या मानाने खेडेगावात सर्व बाबींचा अभाव असतो. बंदीखाने, दवाखाने, शाळा, छावणी, अधिकारी वर्गाची घरे, मोठ्या व्यापाऱ्यांचे वाडे, सावकारांचे वाडे, वैद्य लोक, बाजार इ. गोष्टींनी शहर सुधारलेले आहे. अशाप्रकारे खेडे व शहर यातील तफावतीचे वर्णन झाले आहे.

शेतकरी मागावर विणलेले जाडेभरडे, ओबडधोबड स्वदेशी कपडे वापरतात. शेतकऱ्यांच्या डोक्याला फाटके व मळके मुंडासे असते. अंगामध्ये बंडी किंवा अंगरखा व धोतर असते. खांद्यावर घोंगडी असते. स्त्रियांचाही पोशाख म्हटला तर लुगडी व चोळी सर्वच स्वदेशी पोशाख वापरतात. पोशाखाबरोबर स्वदेशी वस्तूंचा वापर केला जातो. ऊन, वारा, पाऊस यापासून संरक्षण मिळण्यासाठी हे शेतकरी मजबूत कपडे वापरतात.

शेतकऱ्याच्या पोशाखाबरोबर त्यांचे उच्चारही महत्त्वाचे आहेत. शेतामध्ये काम करताना एकमेकांना सुनावणी करण्यासाठी हाका माराव्या लागतात. म्हणून त्याचे उच्चार कठोर, राठ आणि उद्धट असतात. तसेच शेतांची राखण करण्यासाठी ओरडावे लागते.

गावातील लोकांची बसण्याची सार्वजनिक जागा म्हणजे चावडी होय. या चावडीवर आळशी, मूर्ख, रिकामटेकडे लोक विनाकारण गप्पा मारत असतात. तर काही लोकांची घरे अगदी छोटी असल्यामुळे, लोक चावडीत किंवा देवळात घोंगड्यावर वरखाली घालून झोपतात. ब्राह्मणांच्या घरी पोथ्या पुराणांचा कार्यक्रम चालत होता. गावामध्ये सरकारी कर्मचारी, अधिकारी एखाद्या राजाप्रमाणे शेतकऱ्यांशी वर्तन करत असत. या लोकांचा गावावर खूप दरारा होता.

**भाग २ रा : बळीबा पाटील**

या कादंबरीला फारसे कथानक नाही. 'बळीबा पाटील' हा हुशार, धाडसी, कर्तबगार, निर्व्यसनी व समंजस म्हातारा पाटील आहे. जाती धर्माच्या पलीकडे गेलेला व सगळ्यांना सांभाळून घेणारा 'आदर्श पाटील' आहे. महार, मुस्लिमांसह सर्व त्याला प्रिय होते. त्याने आपल्या नातेवाईकांना व विविध धर्मातील लोक बोलावून सभा घेतली होती. या सभेतील चर्चा म्हणजेच कादंबरी होय.

बळीबा हा स्वभावाने शांत, विचारी व चाणाक्ष होता. तो कोणत्याही प्रसंगाला डगमगत नसे. सर्वांशी मिळून मिसळून प्रेमाने वागत असे व प्रामाणिक वर्तन करीत असे. सर्वांना समान न्याय देत असे. बळीबा हा फार मेहनती असल्यामुळे तो पहाटे चार वाजता उठत असे. आपल्या घोडीवर बसून शेताची देखरेख करीत असे. बंदूक चालविण्यात तो खूप तरबेज होता. त्याला शिकारीचा नाद होता. तो नेहमी मांसाहार करत असे. त्याला दारू पिण्याचा किंवा तंबाखू व पान खाण्याचा नाद नव्हता. त्यामुळे बळीबाला मोठ्या लोकांत मान-सन्मान मिळत असे. गावातील 'भैरोबा या देवतेचा निस्सिम भक्त होता.

अमृतराव भोसले हे बळीबाचे वडील सरदार महादजी शिंदे यांच्या पदरी घोडेस्वारावर प्रमुख सुभेदार होते. यांना बऱ्यापैकी शेती होती. बळीबा हा आपल्या बापास एकुलता एक मुलगा असल्यामुळे वडिलांचा त्यांच्यावर खूप जीव असे. त्याने लहान वयातच बराच विद्याभ्यास केला होता. शेतामध्ये ही त्याने रात्रंदिवस काबाडकष्ट केले होते. जेव्हा बळीबा भोसले कुटाळ गावच्या पोलीस पाटलाचे काम पाहात होता. तेव्हा त्याच्या वडिलांनी सल्ला दिला होता. बाबा आपल्याला ही विकत खटराक नको... पाटीलकीचे काम फार वाईट असते. तेव्हा तू पाटीलकीचा नाद सोडून दे. पण वडिलांचे म्हणणे न जुमानता बळीबाने 'कपिलापूर'ची पाटीलकी स्वीकारली.

सत्य, न्याय, सहनशीलता, निष्काम, नि:पक्षपातीपणा इ. गुणांच्या जोरावर बळीबा पाटील झाला. वडिलांच्या मृत्यूनंतर त्याने आपल्या संसाराचा चांगलाच जम बसविला होता. गावात सरकारचे अंमलदार, कामगार यांना बळीबा मानाने वागणूक देत असत. सरकारी

हुकूमाप्रमाणे ते पाटीलकीचे काम चालवत असे. गावातील लोकांना सुखी ठेवण्यासाठी त्याने अतोनात परिश्रम घेतले. गावावर त्याचे वजन असल्यामुळे सर्व त्याला घाबरत असत. गावाच्या कामासाठी तो तत्पर व कर्तव्यदक्ष असे. गावाच्या लोकांसाठी फिर्यादी आर्यादीच्या नादी लागू नका असे सांगत. आपआपसातील तंटे मिटविण्यासाठी त्याने पुष्कळ कष्ट घेतले. त्याने कोणासही दु:ख व त्रास दिला नाही. असे बळीबा पाटीलचे 'पाटीलकी'चे काम पाहून साहेबांनी त्यांचे कौतुक केले होते.

बळीबाला 'सईबाई' नावाची पत्नी होती. गावात त्याच्याएवढे कोणाचेही कुटुंब मोठे नव्हते. अफाट बारदान्यासारखे त्याचे कुटुंब होते. त्याच्याएवढे दुसरे कोण श्रीमंत नव्हते. बळीबाने शेतमळ्याची देखभाल करण्यासाठी एकूण २० गडी ठेवले होते. त्यांच्यावर देखरेख करण्यासाठी एक हुशार कुणबी ठेवला होता. बळीबाने स्वकष्टावर एकूण आठ मळे, चाळीस बैल, चाळीस खंडी मेंढरे, सहा म्हैशी, बारा गाई, आठ-नऊ घोड्या, चार घोडे होते. या बरोबरच एक भव्य आकाराचा वाडा इ. मिळविले होते. त्याची एकूण इस्टेट सुमारे सव्वालाखाची होती. एकंदरीत या सर्व गोष्टींचा विचार करता बळीबा हा सुखी व समाधानी होता. पण अशा स्थितीत त्याचे मन एकाएकी उदास झाले. आपण सतत कष्ट करतोय पण यातून काही निष्पन्न होत नाही. आपल्या संसाराच्या वाटाघाटीत आपण धर्माचाही विचार करायला हवा, असे त्याला वाटू लागले. यासाठी बळीबा रावसाहेबाला पत्र पाठवून बोलावून घेतो व उपाय सुचविण्यासाठी सभा घ्यायची ठरवितो.

**भाग तिसरा :**

बळीबाने आपल्या सर्व कुटुंबातील मुला-मुलींना, नोकर, स्नेही, सोबती व सर्व भाऊबंदांना बोलावून एक सभा घेतली. या सभेत आपण कोण आहोत? ईश्वराने आपणास कशाकरिता निर्माण केले आहे? असे प्रश्न विचारले आहेत. तसेच ईश्वर जाती व धर्म यावर चर्चा झाली. त्याचबरोबर स्त्री शिक्षणाविषयीही विचार मांडले आहेत. या चर्चेची सुरुवात प्रश्नोत्तराने होते. दत्तु महार, राम्यागडी, पुराणिक, महंमदभाई, रुपचंद मारवाडी आदींचा समावेश होतो. ईश्वर, धर्म, जात म्हणजे काय? असे प्रश्न विचारतो. याचे उत्तर बळीबाचा

मुलगा अनाजीबुवा 'ईश्वर सर्वत्र आहे' असा देतो. जात म्हणजे काय? या प्रश्नाचे उत्तर देताना रावसाहेब म्हणतो, 'ईश्वराने फक्त दोनच जाती निर्माण केल्या आहेत. त्या म्हणजे स्त्री व पुरुष. त्याने जर आणखी जाती निर्माण केल्या असल्या तर त्या जातीच्या लोकांनी जन्मत:च खूण दिली असती. समाजातील जातीभेद मतलबी लोकांनी निर्माण केला. त्यामुळे समाजात गट-तट निर्माण झाले आहेत. याचा फायदा स्वार्थी लोकांनी घेतला.' ईश्वराविषयी बोलताना, दौलतराव व रावसाहेबाने 'ईश्वर' हा जगाचा निर्माता आहे. पण तो दगड, धातू, पक्षी वा मनुष्य नव्हे. तो एकच असून, तो कोणताही उच्च-नीच असा भेदभाव मानत नाही. असे या चर्चेत सांगितले आहे.

'बळीबा पाटील' या कादंबरीत 'बळीबा'चे जीवनदर्शन घडविणे हा कथेचा मुख्य उद्देश होता. तर धर्म, ईश्वर, जात, पुनर्विवाह याविषयी झालेल्या चर्चेमुळे कथानकाला पूर्णत्व आले आहे. ही चर्चा बळीबाच्या जीवनाशी एकरूप झाली आहे. मुख्य कथानकाबरोबरच चर्चेचा विषय आल्याने ही कादंबरी वाचण्याची उत्कंठा अधिकच वाढते. चर्चा वा संवादात्मक पद्धतीचा उपयोग केल्यामुळे कादंबरी वाचनीय व आकर्षक ठरते. म्हणून 'बळीबा पाटील' ही चर्चात्मक कादंबरी लिहणारे भालेकर पहिले लेखक असावेत.

बळीबाच्या पायाशी सुख व ऐश्वर्य लोळत होते. पण त्याच्या मनात एकाएकी विचार आला. आपण धर्माकडेही थोडेसे लक्ष दिले पाहिजे. जन्माचे सार्थक कसे करावे? व धर्मविषयक चर्चा बळीबा पाटील सारख्या शेतकऱ्याने घडवून आणावी हीच अभूतपूर्व घटना म्हणावी लागेल. या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी त्याने सर्वांना एकत्र बोलाविले आहे. यावेळी बळीबाचा सर्वात मोठा मुलगा आळंदी-पंढरीची वारी करावी. म्हसाजीबुवा नित्य ब्राह्मणभोजन चालवावे असे सुचवितो. तर अनाजी विहिरी बांधण्यास व धर्मशाळा बांधण्यास सांगतो. कुसाजीचे मत ब्राह्मणभोजनाचे मुक्तद्वार ठेवावे. यांच्यापेक्षा घाररावाचे वेगळेच मत आहे. अज्ञानी शूद्रजनांना विद्येविषयी उपदेश करावा, याशिवाय दौलतरावाने आपले मत व्यक्त करताना, हिंदू धर्म म्हणजे काय? याविषयी सारांश रुपाने छोटे पुस्तक काढले होते. ही पुस्तके छापून पाटलांना वाटावीत तर विद्वान रावसाहेबाने आपल्या पत्रातून कळविले आहे.

शूद्र लोकांना ज्ञान मिळेल अशी तजवीज करा. कलाकुशलतेची आवड असणारा बाळासाहेब याने कलाकुशलतेची वाढ करावी असे सुचविले. अशा या अष्टपुत्रांची मते कथानक पुढे नेण्यास मदत करते. येथे सत्यशोधक समाजाच्या मताचा प्रभाव दिसून येतो.

बळीबाने अष्टपुत्रांबरोबरच मुलींचेही मते जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे. म्हाळसाबाई म्हणते, 'विद्या शिकून आपणास काय काय करायचे' आहे. जे वाडवडिलांपासून चालत आले आहे. तेच आपण करावे असे मत व्यक्त करते. मैनाबाई 'पुनर्विवाहाची' मागणी करते. या सर्वांबरोबर बळीबा आपल्या पत्नीचेही मत घेण्यास विसरत नाही. सईबाई म्हणते ब्राह्मण भोजन घालण्यापेक्षा आपल्या जातीस भोजन घालावीत, असे मत व्यक्त करते. प्रत्येकाच्या वेगवेगळ्या मतामुळे बळीबा गोंधळून जातो व तो शेतमळ्यामध्ये निघून जातो. दोन हजार रुपये शूद्रांना विद्या देण्यासाठी व एक हजार रुपये तीर्थयात्रेसाठी खर्च करायचे, असा बळीबा मनाशी पक्का निश्चय करतो. उठून तो आपल्या मळ्यातून घराकडे निघू लागतो. तोच बळीबाचा प्रिय टिप्या नावाचा कुत्रा वेगाने धावत येतो. आणि त्याच्या पायाशी लोळण घेऊ लागतो. बळीबाला हे पाहून आश्चर्य वाटूलागले. हा टिप्या असा का करतोय! हे त्याला समजेना. पण विचारांती त्याच्या लक्षात आले. आपण जनावरांसाठी काहीच केले नाही. त्यावेळी जनावरांविषयी छोटे पुस्तक लिहून त्याच्या प्रती प्रत्येक शेतकऱ्याला द्यायचे असे ठरवतो. कादंबरीतील कथानकाच्या शेवटी टिप्याचे आगमन हा एक विलक्षण प्रसंग आहे. हे आगमन बळीबाचे प्राणीमात्रावरील प्रेम व्यक्त करणारे आहे. त्यामुळे कथेला एक वेगळेच वळण मिळाले आहे. कुत्र्याचा आणि शेतकऱ्यांच्या अगदी निकटचा संबंध आहे हे यावरून स्पष्ट होते.

सर्व समाजातील मत-मतांतराचे प्रतिनिधीत्व या चर्चेच्या वेळी आढळते. सनातनी, सुधारक सत्यशोधक मताच्या प्रभावाचे विचार स्पष्ट होतात. ब्राह्मण भोजने, दक्षिणा याविषयीचे शेतकऱ्यांना ज्ञान मिळते. यामधून स्त्रियांच्या उन्नतीचीही चर्चा झाली आहे. 'पुनर्विवाहा'चा विषय मांडला आहे. या चर्चेत सहभागी झालेल्या दत्तु महार, राम्या गडी, रुपचंद मारवाडी, पुराणिक व महंमदभाई इ. सर्व जातीधर्माची माणसे प्रतिनिधीत्व करतात.

बळीबा जनावरांविषयी विचार करीतच घरी पोहोचतो व सर्वांची व्यवस्था करून थोड्या दिवसांतच एक चांगले जेवण देऊन तीर्थयात्रेस जाण्याचा निश्चय करतो. बळीबाचे जीवन सुखी व समाधानी होते. पण त्याला परमार्थाची ओढ लागली होती. अज्ञानी शेतकऱ्यांची गुलामगिरी पाहून तो मनामध्ये असामाधानी होता. मानसिक सुख मिळावे म्हणून बळीबा तीर्थयात्रा व ईश्वर या गोष्टींकडे वळला असावा. समाजावर अध्यात्माचा प्रभाव असल्यामुळे कथानकाचा शेवट अशाप्रकारे केला आहे. आपल्या हातून चांगले सत्कार्य व्हावे, पुण्य घडावे असा जीवनाचा शेवट व्हावा. अशी तत्कालीन विचारसरणी होती. म्हणून कादंबरीच्या शेवटी बळीबाने 'तीर्थयात्रेस जाण्याचाच निर्धार केला. या कादंबरीतून जीवनाचे सार्थक कसे करावे? हा विषय मांडून बहुजन समाजाला एक नवी दिशा दिली आहे. असा विचार करून भालेकरांनी 'बळीबा पाटील' कादंबरीचा शेवट केला आहे.

**व्यक्तिरेखा/व्यक्तिचित्रण**

कादंबरीत व्यक्तिरेखांना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. कादंबरीला कथानक आवश्यक असते, तर कथानकाला व्यक्तिरेखा आवश्यक असतात. त्यामुळे 'व्यक्तिरेखा' हा घटक कादंबरीत महत्त्वाचा ठरला आहे. व्यक्तिरेखांमुळे कादंबरीला आकार प्राप्त होतो. कोणतीही साहित्यकृती घेतली तर तिच्या केंद्रस्थानी मानव असतो. मानवाशिवाय कादंबरी पूर्णत्वास जाऊ शकत नाही. याची साक्ष आपणास 'बळीबा पाटील' ही कादंबरी देते. या कादंबरीत प्रमुख व्यक्तिरेखेबरोबरच काही इतर प्रमुख व्यक्तिरेखा आहेत. तसेच काही गौण व्यक्तिरेखा आलेल्या आहेत. या व्यक्तिरेखांमुळे कादंबरीला गती मिळाली आहे. एकूण २२ व्यक्तिरेखा आहे. रावसाहेब, दौलतराव, बाळासाहेब, मैनाबाई हे भालेकरांच्या विचारांचे प्रतिनिधीत्व करतात आणि बळीबाची इतर मुले पारंपरिक विचार व्यक्त करतात. त्याचबरोबर राम्यागडी, दत्तु महार, पुराणिक, महंमदभाई व रुपचंद मारवाडी या गौण व्यक्तिरेखाही महत्त्वाच्या आहेत.

### अ) प्रमुख व्यक्तिरेखा

#### १) बळीबा :-

'बळीबा पाटील' हा कादंबरीचा प्रमुख नायक आहे. तो ९५ वर्षांचा वृद्ध आहे. हा स्वभावाने शांत, विचारी, कष्टाळू, प्रामाणिक व धाडशी होता. शरीराने उंच व सुदृढ आहे. तो कामात सत्यप्रिय व न्यायप्रिय होता. कोणी एखादी चहाडी किंवा थोतांड आणले तर तो सर्वांना समान न्याय देत होता. सर्व मनुष्यप्राण्यांवर जसा प्रेम करत होता तसा तो शेतीवर जीवापाड प्रेम करत होता. वयाने थकत चालला असला तरी तो मेहनती होता. दररोज पहाटे चार वाजता उठून घोडीवर बसून शेताची चांगली देखरेख करीत असे. त्याला शिकारीची फार आवड होती. तसेच तो नेमबाजीत तरबेज होता. तो मांसाशिवाय जेवण खात नसे. निर्व्यसनी, जातीभेद न मानणारा, खऱ्या धर्म समाजाचे हित जाणणारा असा आदर्श, सद्गुणी 'बळीबा पाटील' होता. या गुणांच्या जोरावर त्याने पाटीलकी चालविली. म्हणून त्याची मोठ्या लोकांमध्ये प्रशंसा केली जात असे. तो गावातील 'भैरोबा'च्या देवाची उपासना करीत असे. भैरोबाचे दर्शन घेतल्याशिवाय अन्नपाणी ग्रहण करीत नसे.

बळीबा हा 'फरडा कारकून' असून कुलकर्ण्यांची जागा दाखवून देणारा पाटील होता. कुलकर्ण्यांचे कूट कारस्थान त्याला माहीत होते. म्हणून बळीबा कुलकर्ण्यांस इतर खेड्यातील कुलकर्ण्यांच्या दिमाखाप्रमाणे न ठेवता धाकात ठेवत असे. तो म्हणत असे, तू माझा नोकर आहेस. तुला कारकून केले आहे. तू कोणत्याही खटल्यात जास्त बोलत जाऊ नकोस. ते तुझे काम नाही. तर तू म्हणशील की इतर खेड्यातील अज्ञान भोळ्या पाटील लोकांस जसे आमचे कुलकर्णी लोक नागवितात. तसे या बळीबाला वागवीन. पण तसे चालणार नाही. बळीबा हा नांगरमोड्या सहीचा मालक नाही. तुझे काम करण्यास मी समर्थ आहे. तुमचे कसब ओळखून आहे. कामापेक्षा वरवरचा पोकळ आव मात्र आणत असता. सरकारी अंमलदार गावात आले म्हणजे पाटलांपेक्षा हुशारी दाखवून मन मानेल तसा कारभार करीत असता तुमची मूठ गार झाली म्हणजे हव्या त्या खटल्याचे स्वरूप बदलून टाकता. पण माझ्यापुढे छक्केपंजे चालणार नाहीत. अशाप्रकारे बळीबाचा कुलकर्ण्यांवर दरारा होता. म्हणून त्याच्या

पाटिलकीचा निभाव लागला. गावात सरकारच्या कामगारांपुढे हांजी हांजी न करता बळीबा त्यांची बडदास्त ठेवीत असे. त्याच्या पाटीलकीचे उत्तम काम पाहून साहेब लोक खूश झाले. त्यांनी बळीबाचे कौतुक केले आहे.

'कपिलापूर' या गावात बळीबा आपल्या बापास एकुलता एक मुलगा होता. त्यामुळे बापाचा त्याच्यावर खूप जीव असे. ते बळीबाच्या ६०व्या वर्षीच निधन पावले. वडिलांच्या मृत्यूमुळे बळीबाला संसाराची जबाबदारी उचलावी लागली. आपल्या मुलाने पाटीलकी करू नये अशी बळीबाच्या बापाची इच्छा होती. पण बळीबाने वडिलांचे म्हणणे ऐकले नाही. त्याने एखादे काम हाती घेतले की, ते पूर्णत्वास नेल्याशिवाय राहात नसे. लहान वयातच त्याने विद्याभ्यास केला होता. त्याला मराठीचे उत्तम ज्ञान होते. इतिहास व भूगोल यांचे ज्ञान नसल्यामुळे तो धर्मवेडा बनला होता. पण संसाराच्या कामातही तो मागे नव्हता. त्याला आपल्या पाटीलकीचा गर्व नव्हता. आसपास खेड्यातील दहावीस पाटील याच्याकडे कामाची माहिती विचारण्यासाठी येत असत. कोणतीही कुचराई न करता तो त्या पाटलांना उत्तम मार्गदर्शन करीत असे. असा 'आदर्श' बळीबा पाटील होता.

गावातील लोकांना सुखी ठेवण्यासाठी बळीबाने अतोनात परिश्रम घेतले. अज्ञानी शेतकऱ्यांना भाषा व लिपी शिकविण्यासाठी धडपड करीत असे. शेतकऱ्यांची पिळवणूक करणाऱ्यास शिक्षा करण्यास बळीबा मागेपुढे पाहत नव्हता. परकीय आक्रमणांना खचून न जाता येणाऱ्या संकटांना सामोरे जाऊन शेवटपर्यंत पाटीलकी टिकविली. त्याने सर्व आपल्या योग्य वर्तनाने इतके वजन बसविल्यामुळे त्याला सर्व घाबरत असत. त्याने कोणाची चहाडी वा भांडणे लावली नाहीत. उलट त्याच्याकडे आलेली भांडणे सामोपचाराने मिटवत होता. फिर्यादी आर्यादीच्या नादी लागून स्वत:चे घर बुडवून घेऊ नका. असे तो सर्वांना मनापासून सांगत असे. ''बाप हो आपण कुणबी लोक अगदी अज्ञान व दीन बनलो असल्यामुळे आपलीच खोड मोडली जाते. हे तुम्हास कसे बरे कळत नाही. आणि आपल्या नजरेसमोर हजारो कुणब्यांची भांडणे पाहिली व त्यांचा भांडता काय परिणाम झाला आणि वतने कशी गहाण पडली वगैरे माहीत असून असे करण्यास धजता हे अगदी वेडेपणाचे काम होय''.[३]

असा उपदेश करून आपसातील तंटे मिटविण्याविषयी प्रयत्न करीत असे. कोणालाही त्याने विनाकारण त्रास दिला नाही. तत्कालीन परिस्थितीचा विचार करता असे लक्षात येते की, बळीबाचे विचार आजच्या परिस्थितीच्या मानाने खूप प्रगल्भ आहेत. याचे ज्वलंत उदाहरण आपणासमोर बळीबाच्या रुपाने भालेकरांनी उभे केले आहे.

बळीबा पाटलाचे कुटुंब खूप मोठे होते. गावात त्याच्याएवढे कोणाचेही नव्हते. त्याला ८ मुलगे व ७ मुली होत्या. त्याच्या चार मुलांनी इंग्रजी शिक्षण घेतले होते. या मुलांचे त्याला खूप कौतुक वाटे. बळीबाने सर्व मुलांना वाटून कामे दिली होती. पण मुलांच्या आळशी स्वभावामुळे त्याला नोकर ठेवावे लागले. त्याच्याजवळ गडगंज संपत्ती व संतती यांच्यामुळे तो सधन होता. अशा स्थितीत बळीबाच्या मनात विचार आला. हे करत असताना आपण धर्माचा सुद्धा थोडासा विचार केला पाहिजे असे त्याला वाटू लागले. म्हणून बळीबाने आपल्या कुटुंबियातील सर्व गड्या माणसांची व मुला-मुलींची आणि स्नेह सोबती व भाऊबंदाची सभा भरवून त्यात आपण कोण आहोत?, आणि आपल्याला ईश्वराने कशाकरिता उत्पन्न केले आहे?, व ईश्वर कसा आहे? याविषयी विचार मांडले आहेत. संसारात ज्याप्रमाणे आपण बारकाईने देखरेख करतो त्याचप्रमाणे आपल्या धर्मासंबंधाच्या गोष्टीत मोठ्या बारकाईने पाहिले पाहिजे. आपणास संसार आणि धर्म या सारखी समजल्या पाहिजेत असे बळीबास वाटते. एका ईश्वराची भीती बाळगून चालावे. हजारो रीतीने भलतीकडे लक्ष लावून विनाकारण वेळ आणि द्रव्य खर्च करणे हे बरोबर नाही.

हिंदु धर्मात निरनिराळ्या लोकांनी निरनिराळे मताचे ग्रंथ रचले आहेत. आमचीही जुनाट लेखावर खात्री होत नाही. तर आपण त्या समजुतीप्रमाणे निराळेच लेख केल्यास काही हरकत नाही. हे बळीबाचे विचार महत्त्वाचे आहेत. येथे भालेकरांनी धर्माची चिकित्सा केली आहे.

याबरोबरच धर्म, जातिभेद, ईश्वर याविषयी चर्चा केली आहे. सर्वांच्या विविध अनुमोदनामुळे बळीबाच्या डोक्यात विचारांचे वादळ उठले आहे. काही दिवस लोटल्यानंतर

एके दिवशी तो सकाळी मळ्यात गेला. एकांतात विचार करत असताना ठरवितो. दोन हजार रुपये शूद्रांना विद्या देण्यासाठी व एक हजार रुपये तीर्थयात्रेसाठी खर्च करायचे ठरवितो. असा निर्णय त्याला योग्य वाटू लागतो. तेवढ्यात त्याचा प्रिय टिप्या नावाचा कुत्रा मोठ्या वेगाने बळीबाच्या पायाशी गडगड लोळू लागतो. हे पाहून बळीबाला आश्चर्य वाटले. नंतर त्याच्या लक्षात आले. आपण जनावरांसाठी काहीच सोय केली नाही. जनावरांची व्यवस्था कशी ठेवावी याविषयी एक स्वतंत्र पुस्तक लिहून त्याच्या प्रत्येक खेड्यात प्रती वाटण्याचा निर्धार केला. सर्वांची व्यवस्था करून आठ-दहा दिवसांत एक चांगले जेवण देऊन तीर्थयात्रेस जाण्याचा निश्चय केला.

'बळीबा पाटील'ची व्यक्तिरेखा धाडसी, कर्तृत्ववान व मोठ्या मनाची जाणवते. त्याच्यावर सत्यशोधक मतांचा प्रभाव दिसून येतो. या कादंबरीत सत्यशोधक मतांचा प्रभाव दिसून येतो. अशाप्रकारे या कादंबरीत भालेकरांनी अत्यंत समर्पकपणे 'बळीबा'ची व्यक्तिरेखा रेखाटली आहे.

**ब) दुय्यम व्यक्तिरेखा/इतर प्रमुख व्यक्तिरेखा**

**१) रावसाहेब :-**

बळीबानंतर रावसाहेबांची व्यक्तिरेखा महत्त्वाची आहे. याचे वय २६ वर्षांचे होते. हा बळीबाचा सर्वात हुशार व विद्वान मुलगा होय. शेतकऱ्यांची सुधारणा करु इच्छिणाऱ्या रावसाहेबांचे स्थान कादंबरीत महत्त्वाचे आहे. नम्र, मेहनती, चिकाटी व चाणाक्ष असलेला रावसाहेब डेक्कन कॉलेजमध्ये बी. ए. वर्गात शिकत होता. त्याला २० रुपये स्कॉलरशिप मिळत होती. मिळालेली स्कॉलरशिप तो आपल्या अज्ञान शूद्र बांधवांच्या मुलांना प्रोत्साहन देण्यासाठी खर्च करी. हा अतिशय धोरणी आणि विचारी होता. शूद्र लोकांना विद्या नसल्यामुळे त्यांची केविलवाणी स्थिती पाहून त्याला खूप वाईट वाटते. यावर तो म्हणतो, ''मला जर शिंदे, होळकर, गायकवाड अशा सरदारांच्या जागी ईश्वराने उत्पन्न केले असते तर आज मी शूद्र वर्गास केवळ ज्ञानाचे आगर करून, सर्व जगभर त्यांच्या विद्वत्तेची ब्राह्मणाप्रमाणे किर्ती पसरविली असती. परंतु नाइलाज आहे. येवढे काम करण्यास मी कंगाल

आहे... मी शिकत आहे ते केवळ शूद्रादी अतिशूद्रास विद्या देण्याविषयी उत्तेजनार्थ शिकत आहे.''[४] असा हा बळीबासारखाच जिद्दी होता. शिक्षणामुळे रावसाहेबाचा कुटुंबामध्ये मोठा मान होता. रावसाहेबाचा विचार घेतल्याशिवाय बळीबा कोणतेही काम करीत नसे.

सुरुवातीला रावसाहेबाला व्यापार करायचा होता. पण बळीबाने त्याचे मन शिक्षणाकडे वळविले. ईश्वर, जात, धर्म व राजकारण याचा त्याने गाढा अभ्यास केला होता. बळीबाने आपले जीवनाचे सार्थक करण्याविषयी एक चर्चा ठेविली होती. या चर्चेसाठी बळीबाने रावसाहेबाला मुद्दामहून पत्र पाठवून बोलवून घेतले. रावसाहेबाने आपल्या ज्ञानाचा उपयोग करून ईश्वर, जात, धर्म याविषयी चर्चा केली. या सभेत हजर असलेल्या लोकांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे रावसाहेबाने दिली.

राम्यागडी, दत्तु महार, महंमदभाई यांना आपल्या हक्कांची, अधिकारांची जाणीव नाही. असे लोक सभेस उपस्थित होते. पुराणिक ही या सभेत हजर होता. या चर्चेत दत्तु महाराने प्रश्न विचारले आहेत. त्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी रावसाहेब बोलण्यास उभा राहतो. ईश्वराने मुख्य जाती कोणत्या केल्या आहेत व त्यांची कर्तव्यकर्मे कोणती? ईश्वर कसा व कोठे आहे? त्याला आपण कोणत्या प्रकारे ओळखावे व आळवावे याचे उत्तर देताना रावसाहेब म्हणतो, ईश्वराने आपणास ज्ञानशक्ती दिली आहे. तिच्या योगाने आपणास बरे वाईट समजते. हे जे मतलबाचे लेख केले आहेत ते ईश्वराने केले आहेत असे म्हणणेच पाप ठरेल. जर ईश्वराने जाती केल्या असल्या तर त्या जातीच्या लोकांना जन्मत:च एखादी खूण असती. ईश्वराने फक्त दोनच मनुष्याच्या जाती केल्या आहेत. त्या म्हणजे स्त्री-पुरुष होय. मनुष्यात विविध प्रकारच्या जाती कशा निर्माण झाल्या. त्यात सुखाच्या गोष्टीचा उपभोग घेणारे आणि इतर हलक्या गोष्टींचा उपभोग घेणारे अशा जाती होत्या. आपल्या धर्मात ज्या जाती निर्माण झाल्या आहेत त्या धंद्यावरून झाल्या असाव्यात, असा समज आहे. याला राजकीय प्रकरणाचा संबंध असला पाहिजे, असे मत रावसाहेबांचे आहे.

यानंतर राम्याच्या प्रश्नाला उत्तर देताना रावसाहेब म्हणतो, राघू, कावळा, गिधाड, पिंगळा या पक्ष्यांच्या वेगवेगळ्या जाती आहेत. ईश्वराने पक्ष्यांच्या जशा वेगवेगळ्या जाती

केल्या आहेत. तशा मनुष्याच्या जाती ईश्वराने केल्या नसाव्यात. त्या मनुष्यानेच केल्या असाव्यात. मानवाची जात एकच आहे हे पटवून देण्यासाठी रावसाहेब उदाहरण देतो. राघू व घार हे दोन जातीचे पक्षी आहेत. यांच्या संयोगाने कधीही त्यांना पिल्ले होणार नाहीत. पण ब्राह्मणीन आणि मांग या दोघांपासून मुले होऊ शकतात. असे त्यांनी आपल्या भाषणातून विचार व्यक्त केल्या आहेत. येथेच सभा संपते.

काही दिवसांनी बळीबा रावसाहेबास आयुष्याचे सार्थक लावण्यासाठी काय केले पाहिजे हे विचारण्यासाठी पत्र पाठवितो. त्या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी रावसाहेब पत्र लिहितो. त्या पत्रात सर्व शक्तिमान परमेश्वर असून त्याने मनुष्यास उत्पन्न केले आहे. यासाठी त्याने एक दृष्टांत दिला आहे. आपल्या कुटाळ गावच्या सर्व जमिनी एकसारख्या नाहीत तर काहींचे उत्पन्न जास्त निघते. तर काहीचे कमी. यात ईश्वराचा काहीच संबंध येत नाही. असे उदाहरण देऊन मनुष्याचा आळस हा घटक कारणीभूत आहे हे त्यांनी लिहिले आहे.

पुढे तो लिहितो, पुण्य म्हणजे हे काय पहायचे असेल, तर सत्य काय आहे हे समजले की पुण्याची किंमत समजते. पुण्य म्हणजे सत्कृत्ये. ही सत्कृत्ये म्हणजे भुकेल्यांना अन्न द्यावे. तहानलेल्यांना पाणी पाजावे. उघड्यास वस्त्रे द्यावीत. पंथाकरिता व निराश्रित अनाथ लोकांकरिता धर्मशाळा, विहिरी, रस्ते, दवाखाने, तळी जरूरीच्या ठिकाणी अन्नछत्रे घालावीत. ही कृत्ये एकाच जातीसाठी न करता सर्वांसाठी म्हणजेच सर्व मानवप्राणी, अनाथ व अडाणी लोक, विविध धर्माच्या, देशांच्यासाठी करावे. लंगडे, थोटे, आंधळे, महारोगी आणि प्रसंगानुसार नागावलेले लोक यांना आश्रय देणे, दुसरे विद्यावृद्धीसाठी उत्तेजन देणे, तिसरे प्राण्यांस विनाकारण त्रास देऊ नये. चौथे हृदयात सत्यास सदा सर्वदा जागा द्यावी, पाचवे दुसऱ्याने केलेले उपकार कधीही विसरू नये. सहावे देशाच्या कल्याणास मदत करणे, सातवे धूर्तांचे खंडन करून त्यांची धूर्त लोकांपासून अज्ञानातून सुटका करावी. श्री. शिवाजी राजा शूद्रांचा कैवारी यापासून अज्ञान शूद्र बांधवांचे बांधव होळकर, गायकवाड, शिंदे या सधन सरदारांनी ही आपल्या शूद्र बांधवांकरिता विद्येविषयी प्रसार केला नाही. आपल्या पूर्वजांनी हितासाठी गोष्टी केल्या पाहिजेत. या गोष्टी वंशासाठी व देशासाठी केल्या

पाहिजेत. याचेच दुसरे नाव 'किर्ती व जन्माचे सार्थक' होय. आयुष्याचे सार्थक करण्यासाठी व जगभर नावलौकिक मिळविण्यासाठी याविषयी रावसाहेब व शूद्र लोकांना विद्या द्यावी, असे पत्रात कळवितो. एवढेच नाही तर शूद्रांना विद्या दिली नाही तर रावसाहेब नावाचा मुलगा तुमचा नाही.[५] असे त्याने कठोर शब्दांत कळविले आहे. पुढे आणखी लिहितो. बाबा, तुम्हाला सर्व पृथ्वीचा इतिहास माहीत नाही. जगात कोणत्या धर्माचे, जातीचे किती लोक आहेत. राजकीय प्रकरणाचा देशाशी निकटचा संबंध आहे. याचे तुम्हाला ज्ञान नाही हे आपल्या पत्रातून लिहिले आहे.

'रावसाहेबा'च्या व्यक्तिरेखेतून भालेकरांनी आदर्श, हुशार मुलाचे व्यक्तिमत्त्व रेखाटले आहे. आजच्या तरुण वर्गांना मार्गदर्शन करणारी व प्रेरणा देणारी रावसाहेबाची व्यक्तिरेखा आहे.

**२) दौलतराव :-**

हा रावसाहेबाच्या अगोदरचा बळीबाचा मुलगा होय. याचे वय ३० वर्षांचे होते. याचा स्वभाव शांत, विचारी व शोधक होता. हा समाजसुधारणेच्या कार्यासाठी धडपडणारा व लोकांचे अज्ञान दूर करणारा आहे. बळीबाच्या प्रोत्साहनामुळे याला विद्येविषयी आवड निर्माण झाली. याने मराठी, इंग्रजी व संस्कृत भाषेचे ज्ञान प्राप्त केले होते. हिंदू धर्मातील सर्व ग्रंथ वाचून काढून ते कसे थोतांड आहेत हे लोकांना पटवून दिले आहे.

रावसाहेबाच्या खालोखाल 'दौलतरावा'चे या कादंबरीत महत्त्वाचे स्थान आहे. या सभेत बोलण्यास प्रारंभ केला आहे. जेवढे ग्रंथकर्ते होऊन गेले त्यातील एकालाही भूगोलाचे ज्ञान नव्हते. त्यांनी एकूण ग्रंथरचना केल्या त्या सर्व हिंदुस्थानातच पृथ्वी आहे असे समजून रचना केल्या आहेत. म्हणजेच आर्यांनी या रचना केल्या आहेत असे नव्हे तर त्यात हिंदूंचाही सहभाग असावा. याचा अर्थ दोन्ही पक्ष एक होते असे नाही. एकंदर हिंदू धर्माच्या ग्रंथात ग्रंथकर्त्यांनी जी गोष्ट एक पै किंमतीची होती. तिला एक मोहरेचे स्वरूप देऊन अतिशयोक्तीने वर्णन केले आहे. या भटांनी अज्ञानी स्थितीत राहून शहाणपणाच्या घमेंडीत कित्येक गोष्टी उघड खोट्या लिहिल्या. हे पटवून देण्यासाठी दौलतरावाने उदाहरण दिले.

'सूर्य पृथ्वीच्या हजारोपट मोठा असून तो केवळ पदार्थ आहे. असे असता तो चालत चालत ह्या पृथ्वीवर कसा येईल आणि कोठे राहील?' तर दुसरे उदाहरण कुंभकर्णाविषयी देऊन चिकित्सा केली आहे. 'त्याच्या नाकपुडींत एक उंट गेला होता तो सापडला नाही. आणि तसाच त्याचा न्हावी, वस्तरासारखा श्वासाबरोबर आत गेला म्हणून तो पाहण्यास आत गेला. तेव्हा हा केवढा चमत्कार . ज्याच्या नाकपुडीत उंट सहज जाऊ शकतो त्याची नाकपुडी केवढी असावी?''[६] याचप्रमाणे सर्व ठिकाणी थोतांड रचून मनुष्यास विनाकारण गोंधळात घालून ठेवले आहे.

या थोतांडावर विश्वास ठेवू नये. आपण आपल्या ज्ञानाच्या योगाने जगातील सर्व मनुष्य एका कुटुंबातील समजावेत आणि ईश्वरास भिऊन नियम करावेत व त्याप्रमाणे वागावे. असे त्याने मत व्यक्त केले आहे. तसेच हिंदू धर्म म्हणजे काय? त्यात कोणते ग्रंथ आहेत? व ते कोणी कशासाठी रचले? या उद्देशाने 'हिंदू धर्म' नावाचे पुस्तक छापणार आहे. ही छापलेली प्रत्येक पुस्तके खेड्यातील फुकट पाटलास वाटावीत, अशी त्याने इच्छा व्यक्त केली आहे.

समाजकार्यासाठी स्वत:ला वाहून घेणारा हा समाज सुधारक आहे. लोकांचे अज्ञान दूर करण्यासाठी त्याने प्रचारकाची भूमिका स्वीकारली आहे. त्याबरोबर धार्मिक, पौराणिक गोष्टींची चिकित्सा केली आहे. याच्यावर महात्मा फुले यांच्या विचाराचा प्रभाव आहे. त्यामुळे दौलतरावांचे या कादंबरीतील स्थान अधिकच लक्षणीय ठरले.

**३) मैनाबाई :**

मैनाबाई ही बळीबाची चौथी मुलगी असून, स्वरूपाने फारच सुंदर होती. हिचा जन्म झाला त्यावेळी बळीबाला शेतमळ्यातून चांगली बरकत मिळाली. हिचे लग्न ग्वाल्हेरातील सरदारच्या मुलाशी झाले. लग्नाचा मुहूर्त मोठमोठ्या शास्त्री पंडितांकडून पाहिला होता. हजारो ब्राह्मणभोजने घातली. सर्व विधी, जप, अनुष्ठाने केली. यासाठी खूपच खर्च केला होता. लग्न लागल्यानंतर आठ दिवसांत तिच्या नवऱ्याचे निधन झाले. बळीबा, त्याची पत्नी

व मैनाबाई यांना खूप दु:ख झाले. विधवा मैनाबाईला जन्मभर आई-बापाच्या घरी वैधव्यात दिवस काढावे लागतात. कारण त्यावेळी पुनर्विवाहाला बंदी होती.

त्या काळात 'पुनर्विवाह' शब्द उच्चारणे हे पाप मानले जायचे. अशा काळात मैनाबाई 'पुनर्विवाह' व 'स्त्री शिक्षण' या विषयावर धाडसाने आपले विचार मांडते. शूद्रातिशूद्रांच्या सभेत सर्व विषयांवर चर्चा होते. जो तो आपली गाऱ्हाणी मांडत असतो. पण स्त्रियांच्यावरती कोणीही बोलले नाही. हे मैनाबाईस खटकते आणि ती बोलण्यास उभी राहते. असे मैनाबाई स्पष्टपणे म्हणते. जो तो आपल्या हिताचे विचार करतो. पुरुषांना जसे वाटते की ब्राह्मणांच्या दास्यत्वातून मुक्ती व्हावी. त्याप्रमाणे पुरुषांच्या जुलमापासून स्त्रियांची सुटका का होऊ नये? असा ती सर्वांना प्रश्न विचारते. पुरुषांना जशी मोकळीक मिळते तशी स्त्रियांनाही मोकळीक मिळावी. स्वातंत्र्य मिळावे. लिहिता-वाचता आले पाहिजे. जसे पुरुषांना अधिकार आहेत तसे स्त्रियांनाही समान अधिकार मिळावेत. अबला स्त्रीला शुल्लक कारणांवरून मारहाण केली जाते. गुलामाप्रमाणे वागणूक दिली जाते. त्यांचा अमानुषपणे छळ केला जातो, असेही ती विचार व्यक्त करते.

मैनाबाईला बोलण्याची संधी दयाळू परमेश्वर व इंग्रज सरकारमुळे मिळाली आहे म्हणून ती बाबांना म्हणते, माझा जन्म झाल्यापासून "तुम्ही पालनपोषण केले आहे. याबद्दल मी आपल्या शरीराचे कातडे काढून तुमच्या पायास जोडा केला तरी मी तुमचे उपकार फेडीन असे नाही."[७] माझ्यामुळे सर्वांना रात्रंदिवस चिंता करावी लागते. माझ्यासारखी करंटी कोण असेल बरे? मैनाबाई बळीबाला म्हणते, 'बाबा ज्या स्त्रिया पुनर्विवाहाला प्रतिबिंब असलेल्या कुळात जन्मतात त्या केवळ बंदिखान्यात आहेत. असे म्हणावयास कोणती हरकत नाही... हिंदुस्थान देशात बहुतेक जातीत स्त्रियांबरोबर पुरुषांचे जे वर्तन असते. ते केवळ गुलामगिरीत असल्याप्रमाणे असते. बरे पुरुषांनी आम्हा स्त्रियांच्या पुनर्विवाहाविषयी जो नियम करून ठेवला आहे तो आमच्या संमतीने केला असेल काय? नाही. त्यांनी आपल्या सुखाकडे लक्षपूर्वक लक्ष पुरवून नियम केला आहे... ज्याप्रमाणे ब्राह्मण लोकांना स्वार्थ साधण्यासाठी ईश्वराने उत्पन्न केले आहे. ब्राह्मणांना शूद्र लोक देव मानतात.

अशाप्रकारे शूद्रांवर वजन बसविले आहे. त्याप्रमाणे स्त्रियांविषयी पुरुषांनी आम्हा स्त्रियांची संमती घेतल्याशिवाय मन मानेल तसे नियम करून ठेवले आहेत. यावर मैनाबाई बळीबाला सुचविते, स्त्रियांना शिक्षण देण्यासाठी जो स्वार्थ कराल तो केवळ महत्पुण्यप्रत होणार आहे. त्यासाठी आपल्या आयुष्यावर पाणी सोडून कष्ट घेईन. मी आपल्या अज्ञान बहिणी पुरुषांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी जीवाची पर्वा करणार नाही. जर स्त्री-पुरुष विद्वान झाले तर संसार सुखाचा होईल. असा मैनाबाईचा दृष्टिकोन स्पष्ट होतो. ईश्वराने पुरुष व स्त्री दोघांना निर्माण केले आहे. पुरुष व स्त्री या दोघांनाही एकमेकांची गरज आहे. दोघेही परस्परांवर अवलंबून आहेत. दोघांनाही बुद्धी, ज्ञान, आयुष्य व शरीरधर्म सारखे आहेत. त्यामुळे दोघांनाही समान अधिकार आहेत. मैनाबाईची ही भूमिका बुद्धिप्रामाण्यवादी व तर्कशास्त्रीयदृष्ट्या महत्त्वाची आहे. याशिवाय तिच्या विचारात समतोलपणा आणि तर्कनिष्ठता आहे.

स्त्री-पुरुष समान आहेत. तरी पुरुषांप्रमाणे स्त्रियांना अधिकार नाहीत. स्त्रियांचे अधिकार हिरावून घेतले आहेत ते मानवी अधिकार म्हणजेच स्त्रियांना 'शिक्षण' आणि 'पुनर्विवाह' करता यावेत यासाठी आपल्या वडिलांना म्हणते, आपल्या जन्माचे सार्थक करायचे असेल तर पुनर्विवाहाची बंदी मोडेल अशी तजवीज करावी. त्यासाठी मनुष्याचे व द्रव्याचे साह्य करावे. बाकी मी सर्व शहरोशहरी माझ्या बहिणीकडे जाऊन त्यांच्यापुढे भिक्षेचा पदर पसरेन व त्यांना मदत मागेन. त्या द्रव्याची व श्रमाची मदत करतील व त्या कामी तुम्ही मला मदत करणार नाही. तर तुमचे मनातही स्त्रियांविषयी निर्दयपणा दिसतो, असे मैनाबाई समजते. असे आपले अनुमोदन देते. 'स्त्री शिक्षण' व 'पुनर्विवाह' या गोष्टींचा मैनाबाई पुरस्कार करते. ज्याप्रमाणे ताराबाई शिंदे, महात्मा फुले यांनी स्त्रीमुक्तीचा विचार विकसीत करून मांडला आहे. त्याप्रमाणे भालेकरांनी मैनाबाईंच्या रूपाने हा विचार कादंबरीतून व्यक्त केला आहे.

अशाप्रकारे 'मैनाबाईंची व्यक्तिरेखा भालेकरांनी स्त्रियांची प्रतिनिधी म्हणून उत्कृष्ट रेखाटली आहे. तिची प्रत्येक कृती स्त्री कल्याणासाठी आलेली दिसते.

### ४) बाळासाहेब :

हा बळीबाचा सर्वात धाकटा मुलगा होय. याचे वय २२ वर्षांचे होते. हा मॅट्रिक पास झाल्यानंतर व्यापारात शिरला. याला कलाकुशलतेची खूप आवड होती. तो कुटाळ गावचा ऐक्यवर्धक सभासद झाला होता. बाळासाहेब अतिशय दृढनिश्चयी, बोलेल तसेच करणारा, वागणारा होता. त्याचबरोबर न्यायी, दयाळू, सत्यवचनी होता. सर्व कुटुंबाचा जीव त्याच्यावर होता. त्याचे लग्न झाले नव्हते.

बळीबाची ही मुले चांगल्या स्वभावाची व विद्वान होती. म्हणून बळीबाला मोठे भूषण वाटे. हा या सभेत बोलण्यास सुरु करतो. याला कलाकुसराची आवड असल्याने कलाविषयी विचार व्यक्त करतो. प्रत्येक मनुष्याने विद्या घेतली पाहिजे हे त्याला मान्य आहे. परंतु तो असे म्हणतो, आपल्या हिंदुस्थानात देशाला दारिद्र्य अवस्था प्राप्त झाली आहे. याचे कारण म्हणजे व्यापारात आपला देश फार मागे आहे. कलाकुशलतेचा तर केव्हाच ऱ्हास झाला आहे. ही कलाकुशलता वाढीस लागावी म्हणून प्रयत्न करावे.[८] त्यासाठी बाळासाहेब ६-७ हजार रुपये खर्च करण्यासाठी तयार होता. एवढ्या रकमेत सर्वांची मनोरथे पूर्ण करण्याचे म्हटले तर शक्य नाही. कलाकुशलतेच्या शाळेपासून त्वरित नफा होणार नाही हे त्याला माहित होते. म्हणून याविषयी विचार करावा, असे त्याचे मत आहे. व्यापार व कलाकुशलतेमुळे समाजाचा विकास होतो. हे विचार आपल्या व्यक्तिरेखेतून मांडले आहे.

कलाकुशलतेची समाजाला जाणीव करुन देण्यासाठी ही व्यक्तिरेखा भालेकरांनी रेखाटली आहे. रावसाहेब दौलतराव, बाळासाहेब, मैनाबाई आधुनिक विचारांकडे कल असणारी मैनाबाईप्रमाणे सईबाईची व्यक्तिरेखा आहे ही कादंबरी महत्त्वाची ठरते.

### ५) सईबाई

'सईबाई' ही बळीबाची पत्नी ८५ वर्षांची आहे. ही स्वभावाने मोठी होती. पण घरातील संसार व्यवस्थेत मोठी दक्ष होती. तिला भटांमुळे पोथी पुराण ऐकण्याची आवड निर्माण झाली होती. ही घरातील सर्वांची काळजी घेत असे. सर्वांच्या वर जीवापाड प्रेम करत असत. मैनाबाईच्या वैधव्याविषयी तिला खूप वाईट वाटत असे.

'सईबाई'चे काळीज हे आईचे आहे. स्वरुप सुंदर मैनाबाई तिचे तारुण्य आपल्या डोळ्यासमोर जळत आहे. तिचे दु:ख सईबाईला एक माता म्हणून विशेषत: स्त्री म्हणून कळते. याचाच विचार करून ती बळीबाला एकांतात बोलावून ज्या काळी पुनर्विवाहाच्या विचार पाप मानला जात असे त्या काळी सईबाई आपले मत व्यक्त करते. ती बळीबाला म्हणते, मैनाबाई विधवा झाली म्हणून तुरुंगातल्या कैद्याप्रमाणे जगत आहे. त्यामुळे माझ्या मनाला समाधान नाही. आम्ही स्त्रियांनी कोणती तुम्हा पुरुषांची चूक केली आहे. बरे आणि पुरुषांनीच कोणते पुण्य केले आहे? आपण जर आपल्या मैनाबाईचा पुनर्विवाह लावून दिला तर आपणास कोण काय म्हणणार आहे. जे परंपरेनुसार रूढी चालत आल्या आहेत. त्या आपण पाळल्या पाहिजेत, असे पुराणिकाने सांगितले असले खरे तर तिच्या मनातील विचार ती बळीबासमोर प्रकट करते.

पुरोगामी विचारांची, पंरपरा मानणारी सईबाई आपले मत सभेमध्ये मांडते. आपण सर्व कुटुंबासह तीर्थयात्रा करीत जाव्यात व अज्ञान जातीस एक दोन चांगली भोजने घालावीत. ब्राह्मण भोजन घालण्यापेक्षा आपल्या जातीस भजले पाहिजे.[१] असे ती विचार स्पष्ट करते. बळीबास म्हणते, तुम्ही मात्र देवधर्म करा व आपल्या जातीस चांगले भजा आणि आपल्या डोळ्यासमोर लग्ने करावीत. लेकी-जावयास सुखी करा. यांचा सुखाचा संसार पोटभर पाहू. म्हणजे झाले असे तिने सुचविले आहे.

सईबाई व्यवहारवादी आहे. ब्राह्मणी पोथ्या ऐकून-त्यामधील दुटप्पीपणा उघड करून सांगते. म्हणून तिने ब्राह्मण भोजना विरोधी भूमिका घेतली आहे. तिची परिवर्तनवादी भूमिका आहे. सर्व स्त्री-पुरुष मानवी प्राणी समान आहे. असे विचार भालेकरांनी सईबाईच्या व्यक्तिरेखेतून सुचविले आहे.

सईबाई पतीची सेवा करणारी व पतीच्या आज्ञेचे पालन करणारी स्त्री आहे. कुटुंबावर जीवापाड प्रेम करणारी व्यक्तिरेखा भालेकरांनी रेखाटली आहे.

**इतर गौण व्यक्तिरेखा :**

कादंबरीत प्रमुख पात्राबरोबरच इतर गौण व्यक्तिरेखाही महत्त्वाच्या आहेत. या व्यक्तिरेखेमुळे कादंबरीचे कथानक फुलत जाते. हे 'बळीबा पाटील' या कादंबरीतील व्यक्तिरेखेवरून दिसून येते.

**१) खंडुजीबुवा :**

हा बळीबाचा सर्वात मोठा मुलगा होता. याचे वय ५० वर्षांचे. याला लिहता-वाचता येत नाही. तो वारकरी संप्रदायात असायचा. त्याने दोन तीन हरिपाठ व एक हजार अभंग मुखोद्‌गत केले होते. तो मासांहार करत असे. त्याला तंबाकू खाण्याशिवाय कसलेही व्यसन नव्हते. याला तीन बायका असून पाच मुली होत्या.

वारकारी संप्रदायात 'बुवा' ही उपाधी लावण्याची पद्धत आहे. तो या संप्रदायात असल्यामुळे तुकारामांचा आदर करत असे. याला मैनाबाईचे म्हणणे बऱ्यापैकी पटते. या कलियुगात विठ्ठल नामस्मरण करुन आळंदी पंढरीची वारी करावी. तिर्थयात्रा करणे. विविध प्रकरचे ग्रंथ वाचणे, स्नानसंध्या करणे. टिळाटोपी या पोकळ गोष्टी आहेत. असे तो बोलत असतो. याही पुढे जाऊन तो सभत म्हणतो. बाबा "आपण आळंदी पंढरीस जाऊन पांडुरंगाच्या ठिकाणी आयुष्याची समाप्ती करावी. व शेवटपर्यंत हरी हरी भजनात काळक्षेम करावा, आणि अशा क्षेत्रांचे ठिकाणी भक्त मंडळीकरिता काही तरी किर्ती होण्यालायक सोई करुन ठेवावी."[१०] असे तो सभेत मत मांडतो.

**२) म्हसाजी :**

हा खंडुजीनंतरचा बळीबाचा ४६ वर्षांचा मुलगा होय. याचा स्वभाव रागीट, फिर्नाफिन्या आणि हेकेखोर होता याला पुराण-पोथ्या वाचण्याचा छंद आहे. तीर्थयात्रा, व्रते, उपोषणे, सोवळे -ओवळे याची आवड होती. यांच्यावर ब्राह्मणांचा मोठा प्रभाव होता. हा सोवळेचार फक्त लोकांना दाखविण्यासाठी करत असे. पुढे चोरून मांसाहार व दारू पिऊ लागला. त्यामुळे बळीबा त्याच्यावर नाराज असे. याला चार बायका होत्या. मुले-बाळे नव्हती बळीबाने याच्याकडे लिहिण्याच्या देखरेखीचे काम सोपविले आहे.

म्हसाजीला बळीबाचे भाषण आवडत नाही. बळीबाला रावसाहेब दौलतराव मैनाबाई यांनी उपदेश केला असावा असे वाटते. जमलेल्या सर्व लोकांपुढे आपले मनोगत व्यक्त करण्यास सुरुवात करतो. त्याच्या मते कलियुगाचे दिवस असल्याकारणाने दिवसेंदिवस गोब्राह्मणाची निंदा होईल. विद्येचा प्रसार झाल्यामुळे उच्च ब्राह्मणांचे खूप हाल होतील. स्त्रिया पुरुषांच्या बरोबरी करतील त्यामुळे आपले पूर्वज जे करीत आले आहेत तेच करावेत. म्हणून ब्राह्मणाचे सत्व टिकून राहण्यासाठी या सभेमध्ये बाबांना म्हणतो. जीवनाचे सार्थक करायचे असेल तर आपण 'आपल्या डोळ्यांसमोर नित्य ब्राह्मण सहस्त्रभोजन चालवावे, आणि तुमची कर्णाप्रमाणे सर्व जगभर किर्ती होईल अशी दक्षणा वाटींत जावी व देवालये बांधावीत. तीर्थयात्रा करीत फिरावे'. असे ती सांगते वर शास्त्री पंडिताचा सल्ला विचारावा असे मत सांगितले आहे.

**३) अनाजी बुवा :**

या बळीबाच्या मुलाचे वय ४३ वर्षांचे होते. हा स्वभावाने शांत, विचारी आणि थोडा घुम्मा होत्या. याला थोडेफार बाळबोध येत होते. अनाजी हा हिंदु धर्मातील अतिशोक्तीने रचलेली थोतांड जाणत होता. पण तो अद्वैत मताच्या पाशात अडकला होता. हा ब्रम्हज्ञानी लोकांचा भक्त होता. याचा बोलण्यावरून नास्तिकासारखे वाटे. बळीबाने याच्याकडे फक्त बाहेरील कामकाज व देखरेख सोपविली होती. त्याला दोन बायका होत्या. एक मुलगा व तीन मुली होत्या.

अनाजीला खंडुजी व म्हसाजी यांची मते फारसी योग्य वाटत नाही. म्हणून तो स्वत: बोलण्यास सुरुवात करतो. तो बाबांना म्हणतो, ''हरी हरी करून तसेच देवळे बांधून किंवा ब्राह्मणभोजने घालून कोणताही तुम्हास उपयोग होणार नाही. याजकरिता आपण ठिकठिकाणी रस्त्यावर विहिरी बांधा, धर्मशाळा, रस्ते, तळी बांधा नाहीतर मरेपर्यंत तुमच्या जिवास सदासर्वकाळ समाधान वाटेल अशा गोष्टी करा.''[१२]

खंडुजी व म्हसाजीपेक्षा अनाजीचे मत वेगळे आहे देवळे बांधून व ब्राह्मणभोजन घालून काहीच फायदा नाही. तर गोरगरिबांसाठी विहिरी, तळी बांधल्या, धर्मशाळा काढव्या तर याचा फायदा होईल.

**४) कुसाजी :**

'कुसाजी' या बळीबाच्या मुलाचे वय ३८ वर्षाचे होते.तो निरक्षर होता. हा पुर्णपणे व्यसनाच्या आहारी गेला होता. तो घरातील चोऱ्या करुन सावकाराची देणी भागवित असे. यांच्या वाईट वर्तनामुळे याच्यावर कोणतीही जबाबदारी सोपविली नाही. याला एकून तीन मुले व एक पत्नी होती.

या सभेमध्ये कुसाजी बोलण्यास उभा राहतो. बाबा, आपल्या कडून पाहिजे तशी पुण्यकृत्ये होत नाहीत. तर आपण बरेच पातकी झालो आहोत. तुम्हांला पुण्य करायचे असेल तर ''ब्राह्मणभोजनाचे मुक्तद्वार ठेवावे व तेथे जेवढे ब्राह्मण येतील त्यांस एकेक रुपया दक्षणा देत जावी आणि तसेच मोठाल्या क्षेत्री अशीच अन्नछात्रे घालावीत. त्याचप्रमाणे तुम्ही जागोजाग मोठमोठाल्या देवस्थानाजवळ जप, अनुष्ठान बसवावेत, किंवा तुम्ही मोठाल्या इमारती, देवस्थाने बांधावीत म्हणजे तुमची कीर्ती चोहीकडे पसरून तुमचा मोठा लौकिक होईल.''[१३] असे मत त्यांनी व्यक्त केले आहे.

**५) धारराव :**

याचे वय ३४ वर्षांचे होते. या बळीबाच्या मुलाला इंग्रजी व मराठीचे फारसे ज्ञान नव्हते. याला शिक्षणासाठी योग्य प्रोत्साहन मिळाले नाही. म्हणून हा वाईट संगतीमुळे वाया गेला होता. त्याला प्रथम तालीमबाजीचा छंद जडला. कबुतरे पाळणे, जादू, मंत्र, मूठ, किमया करणे हे नाद लागले होते. पुढे हे सर्व सोडून ब्राह्मणांच्या ऐक्यवर्धक सभेत सभासद झाला. भगवी वस्त्रे धारण करुन लोकांना उपदेश करण्याचा विचार करु लागला, यानंतर त्याने सत्यशोधक सभासद होण्याच्या प्रयत्न केला.

धारराव हा सर्वांच्या पुढे आपल्या वडिलांना म्हणतो ''शूद्र लोकांतील दहा पाच हुशार गृहस्थ पाहून त्यांस चांगले विद्वान बनवावेत त्यांच्याकडून सर्व जगभर (हिंदुस्थानभर)

उपदेश करीत फिरवीत जावे. त्याने फक्त अज्ञानाने गांजलेल्या लोकांस विद्यावृत्तीविषयी झटण्यास उपदेश करीत जावा. त्याबद्दल त्या उपदेशकास तुमच्या मार्फत पगार मिळत जावा.''[१४] अशी त्यांने विनंती केली आहे.

शूद्रातिशूद्रांना ज्ञान मिळणे ही त्याकाळी गरज होती व अज्ञानी लोकांना शिक्षण मिळण्यासाठी भालेकरांनी या कादंबरीतून हा विषय सुचविला असावा. तसेच जादू, मूठ, मंत्र या वाईट गोष्टींची आवड लागून धारराव दुराचारी बनला. हे भालेकरांनी या व्यक्तिरेखेतून स्पष्ट केले आहे.

'बळीबा पाटील' या कादंबरीत बळीबा, रावसाहेब, दौलतराव, बाळासाहेब, मैनाबाई, सईबाई या व्यक्तिरेखा पुरोगामी विचार मांडणाऱ्या आहेत. तर खंडुजी, म्हसाजी, अनाजी, कुसाजी, धारराव ही व्यक्तिरेखा रेखाटून भालेकरांनी विविध स्वभावाचे नमुने आपणासमोर उभे केले आहेत. समाजातील निरनिराळ्या विचार प्रवाहाचे प्रतिनिधीत्व मुलांच्या विचारात रेखाटले आहे.

**६) म्हाळसाबाई :**

ही बळीबाची सर्वात थोरली मुलगी. विद्या न घेतलेली म्हाळसाबाई सभेत आपले विचार मांडते. ''विद्या आणि फिद्या करायची काय?'' अज्ञानी व अशिक्षित असल्यामुळे त्या काळातील स्त्रियांची समजूत होती. शिकून काही उपयोग नाही. हे त्यावेळी समाजातील स्त्रियांच्या मनावर ती ठसले होते. हे आपल्या लक्षात येते.

या सभेत म्हाळसाबाई अनुमोदन देते. ''आपण सर्व कुटुंबासह तीर्थयात्रा करीत करीत फिरावे आणि आपले जे धर्मगुरु ब्राह्मण यास पोथींत सांगितल्याप्रमाणे अनेक दाने देऊन त्यांची शांती करावी.''[१५] असा तिने सल्ला दिला आहे. अज्ञानी असल्यामुळे तिच्यावर पुराणमतांचा पगडा आहे.

**७) धोंडूबाई :**

धोंडूबाई ही बळीबाची तिसरी मुलगी होय. तिचा नवरा एका शूद्र राजाच्या दरबारात मानकऱ्याच्या जागेवर होता. यावर राजकर्त्यांची फार मर्जी होती. काही दिवसांनी ब्राह्मण

लोकांनी शूद्र उपाधी लागते. म्हणून त्याला दरबारातून काढून टाकले. पुढे तो आपल्या कुटुंबासह बळीबाच्या येथे राहू लागला याचा एक मुलगा मुका होता. शिवाय एक मुलगा व एक मुलगी होती.

या सभेमध्ये हिचे मत विचारत घेतले आहे. धोंडूबाई बोलण्यास सुरुवात करते, आपण आपल्या दैवतास (जातीस) उत्तम उत्तम भोजने द्यावीत कारण आपल्या जातीत मेजवानी कशी असते आणि पक्वान्न कसे असतात हे लोकांना माहित नाहीत. याकरिता नित्य आपल्या लंगोटया घोंगड्यास मोठमोठाली भोजने द्यावीत व त्यांना वस्त्रे वाटावीत कुणबी लोकांना बैल व औते द्यावीत तसेच कर्जाचे बोजे कमी करावेत. आपल्या धाकट्या मुलाचे लग्न डोळ्यांसमोर करावे. आपण गावातील लोकांना वस्त्रे, भूषणे द्यावीत आणि एकवेळ सर्व जातीस उत्तम भोजन देऊन सर्वांस आनंदित करावे.[१६]

**८) दत्तु महार :**

दत्तु महार ही व्यक्ती चर्चेतील महत्त्वाची आहे. हा अज्ञानी व अशिक्षित होता. त्यामुळे याला ईश्वर, धर्म, जातिभेद या विषयीचे ज्ञान नाही. बळीबा जातीभेद मानत नाही. दत्तु महार हा बळीबाचा स्नेही आहे. तो सभेमध्ये प्रश्न उपस्थित करतो जाती ईश्वराने निर्माण केल्या की मनुष्याने? तसेच धर्म म्हणजे काय? ईश्वर म्हणजे काय ? असे प्रश्न दत्तु महाराने विचारले आहेत.[१७] या प्रश्नांची उत्तरे रावसाहेबाने दिल्यामुळे त्यास समाधान वाटते आजचा दिवस अतिशय आनंदचा आहे. जाती, धर्म, ईश्वर यांच्यविषयी ज्ञान मिळाले. तसेच सर्व ग्रंथात थोतांड भरून ठेवले आहे. त्यावर विश्वास ठेवू नये हेही समजले. तर आपल्या मनाला जे जे खात्रीलायक समजेल तेच करावे. विनाकारण मेंढराप्रमाणे एकाने उडी टाकली की, दुसऱ्याने टाकली की, तिसऱ्याने हे काय उपयोगाचे?

दत्तु महाराच्या मनातील शंका दुर होऊन कसे वागावे या विषयी त्याला ज्ञान होते. असे दत्तु महाराचे चित्रण केले आहे.

## ९) राम्यागडी :

बळीबा हा नोकरांना सुद्धा मानाची वागणूक देत असत. त्याच्या घरी 'राम्या' नावाचा गडी होता. तो दत्तु महाराप्रमाणे अडाणी आहे. या सभेत राम्यालाही बोलण्याची संधी दिली आहे. अज्ञानी राम्या सभेत बोलण्यास सुरुवात करतो. ईश्वराने मनुष्य जात निर्माण केली आहे. मनुष्याने स्वार्थ साधण्यासाठी पुष्कळ जाती निर्माण केल्या आहेत. हे दौलतरावाचे म्हणणे त्याला पटत नाही. मग तुम्ही असे म्हणू कसे शकता? मनुष्याची जात एकच आहे. हा त्याने प्रश्न विचारला आहे पुढे तो म्हणतो राघू कावळा, गिधाड, पिंगळा हे निरनिराळ्या जातीचे पक्षी आहेत. ज्याप्रमाणे पक्ष्यांची जाती वेगवेगळ्या आहेत. त्याप्रमाणे मनुष्याच्या ही वेगळ्या जाती आहेत.[१८]

## १०) पुराणिक :

'पुराणिक' हा शूद्रातिशूद्रांच्या सभेस हजर होता. दत्तुच्या या भाषणाने पुराणिकाचे पित्त खवळले आहे. पण पुराणिकाने जराही दाखवून न देता तो बोलण्यास सुरुवात करतो. आम्हा गरीब ब्राह्मणांसाठी आता कोण आहे. गोब्राह्मण प्रतिपालक मोठमोठाले योध्दे होऊन गेले. आता ते सर्वच नाहीसे झाले. असे गोड बोलण्याचा प्रयत्न करून सभेतील लोकांची दिशाभूल करीत होता. जातिभेद आणि ईश्वराविषयी सूड लोकांना ज्ञान झाले की ब्राह्मण लोकांचे नशीब फुटणार हे त्याला माहित होते. या गोष्टी लोकमनात बळकट होत नाहीत. तोपर्यंत ब्राह्मणांची स्थिती चांगली आहे. ज्या दिवशी बहुजन समाजाला जातिभेदाविषयी व ईश्वराविषयी चांगले ज्ञान होईल. त्या दिवसांपासून ब्राह्मणांना श्रम करून उदरनिर्वाह करावा लागेल. या सभेत रावसाहेबांना तो म्हणतो "आपण माझे यजमान आहात आम्हा ब्राह्मणांविषयी तुमचा कोणी तरी गैरसमज करून दिला आहे."[१९] असे गुळगुळीत बोलून त्याने वेळ निभावून नेली. याची त्याला पुरेपूर कल्पना होती. म्हणून कलीचे महात्म्य सांगून शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या पुराणिकाने ईश्वर एकच आहे. आपण सर्वजण त्याची लेकरे आहोत. असे खोटे विचार लोकांच्यापुढे व्यक्त करुन सत्याचा खोटा भाव आणत होता. येथे भालेकरांनी ब्राम्हणांचा दुटप्पीपणा उघडकीस आणला आहे.

## १०) रुपचंद मारवाडी :

पुराणिकाप्रमाणे रुपचंद मारवाड्याची ही व्यक्तिरेखा भालेकरांनी उत्कृष्ठ रेखाटली आहे. तो सर्व जमलेल्या ग्रामस्थांसमोर बोलण्यास उभा राहतो. त्याने ब्राह्मणांची धार्मिक मक्तेदारी उघड करुन दाखविली आहे. यासाठी त्याने एक उदाहरण दिले आहे. ब्राह्मण लोक तुम्हाला धर्मांच्या नावाखाली लुटून खातात आम्हाला ईश्वराने अधिकार दिला आहे. असे म्हणतात. आम्ही पृथ्वीचे जन्मजात धनी आहोत व सर्व पृथ्वीचा उपभोग घेण्याकरिता आम्हांला उत्पन्न केले आहे. ब्राह्मणांस सर्वात जास्त अधिकार दिले आहेत असे ऋषींनी आपली मते मांडली आहेत. ब्राह्मणांचे ग्रंथ वाचू नयेत या गोष्टींचे आश्चर्य रुपचंदला वाटते. यावर तो पुढे म्हणतो. माझ्या कुळास अरे बाबांनू तुम्ही आम्हास दरसाल अमुक वेळेला अमुक रुपये दिले म्हणजे तुमचे कर्ज हलके होईल. कारण त्यात आमच्या बापांकडून शर्ती लिहून घेतल्या आहेत. हा रोखे कुळाने हाती लागल्यातरी पाहू नये अशा प्रकारे हिंदु धर्माची चिकित्सा केली आहे. असे रुपचंद आपल्या भाषणातून सांगत असतो. त्या रोख्यात आमच्या वडिलांची अमक्याने वंशपरंपरेने सेवा करण्याचे पत्करले आहे. ही अट करारांत लिहिली आहे. अमुक नाव दिलेल्या लेखांचा स्पर्श होऊ नये व आम्ही तुम्हास कधीही वाईट बोलणार नाही अशा अटी त्या लेखात पूर्वी होत्या. धर्माचे लेख सर्वांना वाचण्यास मिळावेत. जातिभेद कुठलाही न मानता सर्वांना अधिकार मिळावेत.[२०] असे अनुमोदन रुपचंद मारवाडी देतो.

## १२) महंमदभाई :

महंमदभाई ब्राह्मणी मक्तेदारी उघड करुन दाखवितो. याविषयी तो म्हणतो ''हम तुम्हारे हिंदु में तो जिदर देखे सब खुदाच खुदा. फक्त खुदा, पाणी खुदा, झाड खुदा, जनावर खुदा, परिंदा खुदा, सुरज खुदा, अंगार खुदा और तुम्हारे ब्राह्मण ही तुम्हारे खुदा है. ये तो बडी मजा है ये ब्राह्मणकु कोण खुदा बनाया. तुम लोक तर ब्राह्मणकु खुदाच समजते.''[२१] महंमदभाई ब्राह्मणांना कोणी ईश्वर बनविले असा प्रश्न पुराणिकाला विचारतो. पण याचे उत्तर देण्याचे पुराणिकाने टाळले आहे. जर ईश्वराने तुम्हाला ईश्वर बनविले असेल तर जगातील

सर्व लोकांना तुम्ही ईश्वर का नाही बनविले. याचा अर्थ ईश्वराने ब्राह्मण ईश्वर बनविले नाही. आपले स्वार्थ साधण्यासाठी बनावट ग्रंथरचना केली आहे. आपल्या मनाला वाटतील ती मते घुसविली आहेत. आपल्या हितावह गोष्टी करून ब्राह्मण वर्गांनी स्वार्थ साधला आहे. ब्राह्मणी ग्रंथातील दुटप्पीपणा उघड करून दाखविला आहे.

हिंदू धर्मात लोक मंदिरात भेदाभेद करतात. तसेच जातिभेद पाळतात. हे सर्व ज्याला तुम्ही 'खुदा' मानता त्या ब्राह्मणांचे हे कूट कारस्थान आहे. असे सांगून तुकारामाच्या अभंगाचे उदाहरण ही महंमदभाईने दिले आहे. यावरून असे लक्षात येते की मुसलमान धर्मात समता आहे. त्याबरोबरच येथील मुसलमान मूळचे हिंदु आणि भारतीय आहेत. हे त्यांच्या भाषा, संस्कृती विचार-आचार पद्धती यावरुन समजते या सर्व व्यक्तिरेखांवरुन तत्कालीन समाजातील विविध वृत्ती, प्रवृत्तींच्या अनेक व्यक्तीचे दर्शन घडते.

**समारोप :**

'बळीबा पाटील' या कादंबरीत एकूण २२ व्यक्तिरेखा आहेत 'बळीबा पाटील' ही प्रमुख व्यक्तिरेखा आहे. गावचा आदर्श पाटील बळीबाच्या रुपाने चित्रित केला आहे. कष्टाळू विचारी सर्वांना सामावून घेणारा, मायेने जवळ करणारा असा बळीबा पाटील होता. रावसाहेब, बाळासाहेब, दौलतराव, मैनाबाई या दुय्यम व्यक्तिरेखा आहेत. या व्यक्तिरेखा भालेकरांच्या विचारांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या आहेत तर खंडुजी, म्हसाजी, अनाजी, कुसाजी, धारराव ही पाच मुले याबरोबरच बळीबाची पत्नी 'सईबाई' पुरोगामी विचारसरणीची सामान्य स्त्री आहे. ही गृहिणीची भूमिका अत्यंत कर्तव्यदक्षतेने पार पाडते. विद्येचे ज्ञान नसलेल्या म्हाळसाबाई, पारुबाई, धोंडाबाई, चिमणाबाई, मोहोनाबाई, गोजराबाई अशी स्वभावचित्रे रेखाटली आहेत. त्याचबरोबर बळीबाचा नोकर 'राम्यागडी' याचाही समावेश होता, इतर जाती धर्माचे प्रतिनिधीत्व करणारे दत्तु महार, पुराणिक रुपचंद मारवाडी व महंमद्भाई इ. होय. अशा या तत्कालीन समाजाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या व्यक्तिरेखा आहेत. विविध वृत्ती, प्रवृत्तींच्या स्वभावाचे दर्शन घडविले आहे.

इतर कादंबऱ्या प्रमाणे व्यक्तिरेखांचा विकास रेखाटलेला नाही. सभेच्या प्रसंगातून त्या त्या व्यक्तींची मते व्यक्त होतात. त्यांच्या स्वभावावर प्रकाश टाकला जातो.

निवेदनामधून बळीबाच्या मुलांची माहिती दिली जाते.

**भाषाशैली :**

कोणत्याही साहित्यकृतीमध्ये 'भाषे'लाअत्यंत महत्त्व असते. भाषेच्या माध्यमातून लेखक आपले अनुभव मांडत असतो. भाषेच्या वेगळ्या वापरामुळे कादंबरीलाही वेगळे रुप प्राप्त होते. विशिष्ट प्रकारचे भाषेला मिळालेले वळण म्हणजेच भाषाशैली होय. अचूकपणे भाव व्यक्त करण्यासाठी भाषेचा वापर केला आहे. तिचा उपयोग समाजाला अनुसरून पण विशिष्ट रीतीने प्रत्येक व्यक्ती करीत असते. याचा प्रत्यय आपल्याला 'बळीबा पाटील' या रुपकात्मक कादंबरीवरुन घेतो.

'बळीबा पाटील' या कादंबरीत ग्रामजीवनाचे चित्रण येते. तृतीय पुरुषी निवेदनाच्या अवलंब केला आहे. वाचकांना विश्वासात घेऊन कपिलापूरच्या पाटिलकी संबंधी प्राचीन इतिहास मागे कळविला आहे. यावरुन वाचकांना अधिक उत्कंठा लागते. निवेदनातून मधूनमधून प्रश्न विचारले आहेत. उदा. ईश्वराने जेव्हा तुम्हा आम्हास उत्पन्न केले. तेव्हा त्याने किती जाती उत्पन्न केल्या. या सर्व जाती ज्या निरनिराळ्या आहेत. त्या सर्व ईश्वराने केल्या आहेत किंवा मनुष्याने केल्या आहेत, धर्म म्हणजे काय? ईश्वर म्हणजे काय, जातिभेद म्हणजे काय? यावर सभेच्या वेळी प्रत्येक व्यक्ती आपली मते मांडते.

या कादंबरीतून भालेकरांनी पत्राचाही वापर केल्या आहे. त्याची उदाहरणे साखळी पद्धतीने गुंफलेली आहेत. रावसाहेब आपल्या वडिलांना पत्र लिहतो. त्यामध्ये "पहा भुकेल्यास अन्न घालावे, तहानंल्यास पाणी पाजावे. उघड्यास वस्त्रे द्यावीत तसेच पंथाकरिता व निराश्रित अनाथ लोकांकरिता धर्मशाळा, विहिरी, रस्ते, दवाखाने, तळी जरुरीच्या ठिकाणी अन्नछत्रे घालावीत."[२१] अशी उदाहरणे दिली आहेत.

'बळीबा पाटील' या कादंबरीला एका रुपक कथेची प्राप्त झाली आहे. या कादंबरीची भाषा देशी निवेदन शैलीतून आकारास आलेली आहे. निवेदनासाठी प्रमाण भाषा

वापरली आहे. साधी, सोपी, ग्रामीण वळणाची रुपकात्मक भाषा आहे. पाटीलकीचा प्राचीन इतिहास सांगताना अरनेकर, यवन, मियाँजी, शिबाव, पंजोबा, बाळकोबा व राणोजी या नावांना विशिष्ट असा अर्थ प्राप्त झाला आहे. 'बळी' म्हणजे शेतकरी. बळी राजाचा आदर्श शेतकऱ्यांच्या पुढे ठेवला आहे. शेतकऱ्यांचे प्रतिनिधीत्व बळीबा पाटील करीत आहे. म्हणून या कादंबरीस बळीबा पाटील हे नाव सार्थ ठरले आहे. त्याचबरोबर या कादंबरीत बळी पाटील यासाठी 'भोसले', 'कुलकर्ण्यांसाठी' 'मोरोपंत घरफोडे' व गावातील जवसीमांसाठी 'उकळे' व 'मोकळे' ही रुपकात्मक नावे वापरलेली आहेत. त्याचबरोबर 'कपिलपूर' या गावाचे नाव 'कुटाळ' असून ता. उदास, जि. कष्टपूर आहे. याचा अर्थ शेतकरी सतत काबाडकष्ट करत असतात. पण तरीही त्यांच्या वाट्याला उदासीनता येते. ही सर्व नावे काल्पनिक आहेत. भालेकरांची वर्णनशैली संवादात्मकता, प्रसंगी येणारा उपहास, एखादा प्रसंग शैलीदार पद्धतीने रंगविणे. ही पद्धत परिणामकारक करण्याची हातोटी त्यांना जमल्यामुळे त्यांची कादंबरी एक आगळे वेगळे रुप करणारी ठरते.

बळीबा ज्यावेळी वयात आला तेव्हा भालेकरांनी बारकावे वर्णन शैलीतून टिपले आहे. याचे उदाहरण देताना, "आपल्या उघड्यावाघड्या मानवप्राण्यास व गोलावरील झाडेझुडपे, पशुपक्षी, नद्यानाले, दऱ्याडोंगर, सागर-तलाव, सूर्यचंद्र, तारे वगैरे पाहून मोठा चकित झाला. एके दिवशी रात्री आकाशाकडे पाहत विचार करू लागला. हे सूर्यचंद्र व कोट्यवधि बारीक दिसणारे सूर्यचंद्र हे असेच कोठपर्यंत! सर्व सभोवती तेच!!"[२३] यावरून भालेकरांची सूक्ष्म निरीक्षणशक्ती स्पष्ट होते.

बळीबाच्या एका गड्याने घरफोडे कुलकर्ण्यांच्या कुबाडात दोन्ही हाताने काठी भली सडकून ओढली. त्यावेळी कुलकर्णी "कुथत कुथत आणि रडत पळण्यास लागला. एकीकडे काष्टा फिटतच आहे, पागोटे दुसरीकडे तर तिसरीकडे चक्कर येऊन धाड्दिशी पडले"[२४] येथे अतिशयोक्तीचा वापर करून त्यांनी या वाक्यातून विनोद उभा केला आहे. बहुजन समाजाला आपले विचार व्यक्त करण्यासाठी त्यांनी बोली भाषेचा वापर केला आहे. त्यामुळे त्यांची भाषा कुठेही संस्कृतप्रचूर झाली नाही. ती अलंकार बोजड होऊन कृत्रिम झाली नाही.

सामाजिकता व प्रबोधनात्मकता हे 'बळीबा पाटील' कादंबरीचे गुण आहेत. या कादंबरीची निर्मिती, प्रेरणा, आशय व आकृतीबंध यामुळे कादंबरीला सामाजिक मूल्य प्राप्त झाले आहे. कादंबरीचे कथानक व पात्रे रुपकात्मक व प्रतिकात्मक आहे. बळीबा पाटील व त्याचे आप्तमित्र यांच्यामध्ये जीवनाविषयी गंभीर चिंतन होते. त्यांनी अभिव्यक्तीपेक्षा आशयावर भर दिला आहे. कादंबरीचा आशय व विषय पूर्णत: वेगळा आहे.

या कादंबरीतून खेडेगाव, तेथील लोकजीवन, शेती, शेतकरी, त्याचे कष्ट, दारिद्र्य, पाटील-कुलकर्णी संघर्ष, त्यांची कर्तव्ये असे विविधांगी ग्रामजीवनाचे चित्रण आले आहे. 'बळीबा पाटील' या कादंबरीतून अस्सल ग्रामीण जाणिवेतून, अनुभवातून व विश्वातून ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्रण आले आहे. भालेकरांनी या कादंबरीला तर्कशुद्ध मांडणीला लालित्याची जोड देऊन शेतकऱ्यांच्या स्थितीचे वास्तव चित्रण रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांची लेखनशैली मधून-मधून केलेला उपहास, उपरोध या गुणांचा वापर केला आहे. प्रसंगी चित्रमय निवेदन शैलीमुळे या कादंबरीला सहजपणे ललित आकृतीबंध तयार झाला आहे. प्रसंगी म्हणी, वाक्प्रचार, जोडशब्द इ. शब्दांचा वापर केला आहे. भारतीय साहित्य परंपरेचे व्यवच्छेदक लक्षण म्हणजे संवादात्मक लेखन पद्धती होय. भगवतगीता, ज्ञानेश्वरी यासारख्या तत्त्वचिंतनपर ग्रंथ आहेत. या काव्यग्रंथापासून ते महात्मा फुले यांच्या वैचारिक संवादात्मक निवेदनाची देशी शैली प्रकटते. याच देशी परंपरेतून 'बळीबा पाटील' या कादंबरीचे लेखन झाले आहे.

**संवाद :**

कादंबरीतील संवादाची भाषा ही पात्रानुरूप आहे. बळीबा पाटीलचा स्वभाव हा जिद्दी आहे. तो आपल्या वडिलांना सांगतो, ''मला तर पाटीलपणाची फार हौस आहे व पहा तुमच्या डोळ्यासमोरच कशी काय मजा करून दाखवितो. तुम्ही कुलकर्ण्यांचे भय दाखविता.''[२५] या संवादातून बळीबाची कुलकर्ण्यांविषयी चीड व संताप व्यक्त होतो. संवादातून आक्रमकता तर दिसून येतेच, पण त्याची व्यवहारी वृत्ती ही स्पष्ट होते.

संवादासाठी बोलीभाषा वापरली आहे. त्यामुळे कादंबरीतील संवाद अधिकच चटकदार व उठावदार झाले आहेत.

कृष्णराव भालेकरांनी चर्चात्मक कादंबरी लिहून एक नवीन प्रयोग घडवून आणला आहे. जन्माचे सार्थक कसे करावे? याविषयी सईबाई बळीबाला आपले अनुमोदन देताना म्हणते की, ''मात्र तुम्ही देवधर्म करा व आपल्या जातीस चांगले भजा म्हणजे झाले. त्याचप्रमाणे आपल्या मुलांची आपल्या डोळ्यांसमोर लग्ने करा व त्यांचा संसार आपण आपल्या समोर चांगला पोटभर पाहू म्हणजे जहाले.. तसेच लेकी-जावयांस सुखी करा. दुसरे करायचे काय?''[२६] हा संवाद बोलीभाषेतील स्वाभाविकता वाढविणारा आहे. तसेच कुटुंबाविषयी जिव्हाळा निर्माण करणारा आहे. या संवादाद्वारे सईबाईने एक 'संसारी स्त्री' म्हणून आपल्या मनातील भाव-भावना प्रकट केल्या आहेत. कादंबरीतील हा संवाद जिवंतपणाचा प्रत्यय देणारा आहे. त्याबरोबरच सहज, सूचक व मनाची पकड घेणारा आहे.

'व्यक्ती तितक्या प्रकृती' असे म्हटले जाते. ढोंगी, स्वार्थी, मतलबी, पुराणिक याविषयी रावसाहेब म्हणतो, ''जर मी काही न शिकता लंगोट्या नागऱ्याप्रमाणे असतो, तर तुम्हाला नुसता ईश्वराचे वरिष्ठच आहात असे न समजता तुम्ही सर्व जगाचे कर्ते व देवांचे कर्ते असे महापराक्रमी आहात असे समजून, दूरच्या दुरुनच आपल्या चरणी मस्तक ठेवण्याकरिता मी थराथरा कापत कापत तुम्हाशी बोललो असतो.''[२७] या संवादातून रोखठोकपणा व व्यवहारीपणा दिसून येतो. उपहास, उपरोध ही संवादाची वैशिष्ट्ये आहेत.

- संवादाची भाषा सोपी, प्रवाही, टोकदार आहे. तर काही ठिकाणी बिनतोड युक्तिवाद झाला आहे. बळीबा हा एकेश्वरवादी आहे. 'फक्त एका ईश्वराची भीती बाळगून चालावे' असे तो मत व्यक्त करतो. तसेच भक्तीकडे लक्ष देऊन विनाकारण वेड आणि द्रव्ये खर्च करणे योग्य नाही असे त्याचे मत आहे. यावरून त्याला उपासना पद्धती अभिप्रेत आहे.

या कादंबरीत संवादापेक्षा चर्चाच अधिक झाली आहे. मोजकेच व आटोपशीर संवाद आहेत. हे संवाद जिवंतपणाचा प्रत्यय देतात. उदा. बळीबा लोकांना सांगे, ''पुण्यास जाऊन फिर्यादी आर्यादीच्या नादी लागू नका.'' येथे बळीबाची साधी, सोपी भाषा लक्षात येते. तर

दुसरे उदाहरण 'जेणेकरून शूद्र लोकांस ज्ञान होईल अशी तजवीज तुम्ही करा' तर धाररावाचे रावाचे त्याने फक्त 'अज्ञानाने गांजलेल्या लोकांना विद्यावृत्तीविषयी झटण्यास उपदेश करीत जावा'. याशिवाय म्हाळसाबाई म्हणते, "विद्या आणि फिद्या करायची काय?" या संवादामधून त्या व्यक्तीच्या अंतरंगाचे दर्शन घडते. संवादामुळे कादंबरीला कुठेही बाधा व कडवटपणा आला नाही. ईश्वर, धर्म, जाती यावर मनमोकळेपणाने चर्चा झाली आहे. महंमदभाईची हिंदी भाषा, पुराणिकांची संदिग्ध भाषा, सईबाईची व्यावहारिक बोली भाषा, मैनाबाईची सडेतोड भाषा, खंडुजीची आध्यात्मिक भाषा यांचे संवाद मनाला भुरळ घालणारे आहेत. ही कादंबरी संवादात्मक असल्यामुळे कादंबरीत पाल्हाळीकपणा आढळत नाही. यामुळे कादंबरीचे संवाद अधिकच आकर्षक झाले आहेत.

**म्हणी व वाक्प्रचारांचा वापर :**

ग्रामीण कादंबरीला आकर्षकता येते ती खरी, म्हणी व वाक्प्रचाराने. या कादंबरीत खुसखुशीत व चटकदार म्हणी व वाक्प्रचारांचा वापर केला आहे. बाजीरावी राज्याचे वर्णन करताना भालेकर म्हणतात, "ज्याच्या हाती ससा तोच पारधी", "मेल्या म्हशीस आठशेर दूध", "मेंढरात लांडगा", "चोराला चांदण्याचा कंटाळा" इ. म्हणींचा वापर केला आहे.

त्याबरोबरच काही लक्षणीय वाक्प्रचारांचाही वापर करण्यात आला आहे. "बारदान्यासारखा अफाट खटला", "फाजील हांजी हांजी करणे", "मूठगार होणे", "डोळ्यात वाती घालून जीवाचे रक्षण करणे", "पेरणीची घातवेळ साधणे", "दाणा भरीस येणे", "हा हूं करून शेती राखणे", "हातचा धड नसेना", "तजवीज करणे", "मुखोद्गत असणे", "मसलत करणे" इ. वाक्प्रचार आले आहेत.

वाक्प्रचारांबरोबर काही जोडशब्दही आले आहेत. 'अंदाधुंदी', 'सोवळे-ओवळे', 'दांडदुंडगे', 'गुळवणी', 'नररत्ने', 'पुनर्विवाह', 'जातिभेद', 'फाडफोड', 'हेळसांड', 'रात्रंदिवस', 'बरेवाईट', 'बागबगिचा'. 'वरचेवर', 'देखरेख', 'गडीमाणसे' इ. जोडशब्द आले आहेत. वेळप्रसंगी म्हणी, वाक्प्रचार यांचा वापर केला आहे. भालेकरांनी या माध्यमातून भाषाशैलीस एक वेगळा ठसा मराठी वाङ्मयावर उमटविला आहे.

**कादंबरी विषयी इतर लेखकांची मते :**

कृष्णराव भालेकरांची 'बळीबा पाटील' हा कादंबरी ग्रामीण जीवनाचे दर्शन घडविणारी आहे. या कादंबरीबाबत मते स्पष्ट करताना –

१) ग्रामीण साहित्यिक डॉ. आनंद यादव यांच्या मते, ''पिराजी पाटील'' ही धनुर्धारी (रा. वि. टिकेकर) यांनी १९०३ साली प्रसिद्ध झालेली पहिली मराठी ग्रामीण कादंबरी मानावी लागते.''[२८]

२) 'सत्यशोधकी साहित्य परंपरा आणि स्वरूप' या पुस्तकात डॉ. राम गुंदेकर यांचे या कादंबरीविषयीचे मत, 'बळीबा पाटील' ही पहिली यशस्वी मराठी ग्रामीण कादंबरी नसली तरी कादंबरीची पार्श्वभूमी तिने तयार करून ठेवली आहे, असे नक्की म्हणता येईल असे मत व्यक्त केले आहे. ''[२९]

३) बहुजन समाजाची सुधारणा व्हावी या हेतूने सत्यशोधक चळवळीचे गाढे अभ्यासक रा. ना. चव्हाण, 'बळीबा पाटील' ही निबंधवजा कादंबरी आहे. कुणबी लोक विद्यामार्गी व्हावेत व ते पुढे यावेत म्हणून हा प्रयत्न आहे. सक्तीच्या शिक्षणाचा प्रामुख्याने पुरस्कार करणारी (सत्यशोधक समाज ही एक चळवळ) होती. या कादंबरीत लालित्यपेक्षा विचार विपुलता व वस्तुस्थितीची वर्णने अनेक आहे.''[३०]

४) या कादंबरीत ग्रामजीवनाचे वास्तवरूप यथातथ्य स्वरूपात चित्रित झाले आहे. याबद्दल ग्रामीण साहित्याचे व्यासंगी अभ्यासक नागनाथ कोत्तापल्ले यांनी 'पाचोळा आणि दहा समीक्षक' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत संदिग्धता व्यक्त केली आहे. याबद्दल म्हणतात, ''एकंदरीत 'बळीबा पाटील' या कादंबरीचा आणि गावगाड्याचा काहीसा प्रत्यय येतो. अर्थात कादंबरीसारख्या वाङ्मयप्रकारातून ज्या भरघोसपणे ग्रामीण जीवनाचा प्रत्यय यायला पाहिजे तसा प्रत्यय येत नाही. एवढे मात्र खरे. एवढ्या सगळ्या मर्यादा मान्य करूनही मराठीतला हा पहिलावहिला प्रयत्न आहे. असे मत नोंदवायला हरकत नाही.''[३१]

५) ग्रामीण साहित्याचे भाष्यकार डॉ. रवींद्र ठाकूर यांच्या मते, ''या कादंबरीचे लेखन कदाचित कादंबरी म्हणून झाले नसल्याची शक्यता आहे. म्हणून बळीबा पाटील ही ग्रामीण कादंबरी मानता येत नाही. तर धनुर्धारी यांची 'पिराजी पाटील' या कादंबरीची नोंद करावी लागते.''[३२]

६) प्रा. सीताराम रायकर यांनी 'कृष्णराव भालेकर समग्र वाङ्मय या ग्रंथात म्हणतात, ''१९८८ मध्ये 'दीनमित्र' मधून प्रसिद्ध क्रमश: झालेल्या मजकुरास कादंबरी म्हणता येणार नाही. कारण तिचा ऐवज तेवढा नाही. पात्रे, प्रसंग इ. गोष्टींचा विचार करताही 'बळीबा पाटील' ही कादंबरी आहे असे म्हणता येणार नाही. तथापि दुसरे हस्तलिखितही याच सुमारास लिहिले गेले असावे असा तर्क केला तर बळीबा पाटील ही पहिली ग्रामीण कादंबरी ठरेल.''[३३]

७) 'ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास' संपा. प्रा. चंद्रकुमार नलगे, (डॉ. वासुदेव मुलाटे यांच्या ग्रामीण कादंबरी : प्रारंभ ते १९६० या लेखातील प्रस्तावनेत') म्हटले आहे... ''पिराजी पाटील' ही मराठीतील पहिली यशस्वी कादंबरी आहे. मात्र तिच्याही पूर्वी 'बळीबा पाटील'सारखी ग्रामीण जीवनाचा वेध घेणारी, ग्रामीण वातावरणाचे चित्रण करणारी साहित्यकृती म्हणजे कादंबरी लेखनाचा एक प्रयत्न आहे.''[३४]

एकंदरीत 'बळीबा पाटील' या कादंबरीचा विचार करता असे लक्षात येते की, ''ही कादंबरी ग्रामीण जीवनाचे दर्शन घडविणारी व ग्रामीण पार्श्वभूमी तयार करणारी आहे. म्हणून ही मराठीतील पहिली ग्रामीण कादंबरी ठरते''.

**उपसंहार :**

कृष्णराव भालेकर हे ललितलेखक आहेत. 'बळीबा पाटील' ही त्यांची प्रसिद्ध कादंबरी आहे. ही कादंबरी 'दीनमित्र' च्या अंकामधून एप्रिल १९८८ ते जुलै १९८८ या काळात क्रमश: प्रसिद्ध झाली. या कादंबरीचे मूळ शीर्षक 'बळीबा पाटील आणि १८७७ चा दुष्काळ' असे आहे. पण या कादंबरीत दुष्काळाचे वर्णन आलेले नाही. कादंबरीच्या

प्रस्तावनेत कादंबरीची निर्मिती व प्रेरणा स्पष्ट झाली आहे. 'शेतकऱ्यांस सहजरित्या मार्ग सुचून आपली सुधारणा करता यावी', हा हेतू डोळ्यांपुढे ठेवून भालेकरांनी लेखन केले आहे. शेतकऱ्यांच्या दु:खाला 'अज्ञान' व 'दारिद्र्य' हे घटक कारणीभूत आहेत. या गुलामगिरीतून शेतकऱ्यांची सुटका करण्यासाठी व 'शेतकऱ्यांना शहाणे' करणे हा उपाय भालेकरांनी सुचविला आहे. पात्रे, संवाद, प्रसंग, ग्रामीण पार्श्वभूमी वापरून प्रचारकी हेतूने कादंबरी लिहिली आहे. या कादंबरीतून शेतकरी ग्रामीण जीवनाचे दर्शन घडविले आहे.

या कादंबरीचे स्वरूप रुपकात्मक आहे. एकूण चार भागात विभागलेल्या कादंबरीची रचनाही वैशिष्ट्यपूर्ण आहे. या कादंबरीची प्रत्यक्ष सुरुवात बळीबा पाटीलच्या प्राचीन इतिहासाने झाली आहे. नंतर कुटाळ गावाची रचना, शेती करण्याची पद्धत, पिके, आहार, राहणीमान, पोशाख, चालीरिती, उच्चार, सण, पाटील-कुलकर्णी संघर्ष इ. व्यवहार प्रकट होतो. दुसऱ्या भागात बळीबाच्या आदर्श पाटिलकीचे वर्णन आले आहे. त्यांच्या कुटुंबीयांचा परिचय करून दिला आहे. तिसऱ्या भागात बळीबाने सर्व आप्तमंडळी बोलावून ईश्वर, धर्म, जात याविषयी चर्चा केली आहे. तर चौथ्या भागात आपल्या जन्माचे सार्थक कसे करावे? यासंबंधी चर्चा केली आहे. या सभेत प्रत्येकाला आपली मते व्यक्त करण्याची संधी दिली आहे.

या कादंबरीला फारसे कथानक नाही. 'बळीबा पाटील' ही केंद्रवर्ती व्यक्तिरेखा आहे. रावसाहेब, दौलतराव, मैनाबाई, बाळासाहेब, सईबाई या कादंबरीतील दुय्यम व्यक्तिरेखा आहेत. तर इतर गौण व्यक्तिरेखेमध्ये खंडुजीबुवा, म्हसाजी, अनाजीबुवा, कुसाजी, धारराव, म्हाळसाबाई, धोंडूबाई, दत्तु महार, राम्यागडी, पुराणिक, रुपचंद मारवाडी, मोहोनाबाई, गोजराबाई, चिमणाबाई इ. व्यक्तिरेखा रेखाटल्या आहेत. रावसाहेब, दौलतराव, मैनाबाई, बाळासाहेब या व्यक्तिरेखा भालेकरांच्या विचारांचे प्रतिनिधीत्व करणारी आहेत. इतर मुले परंपरावादी आहेत. त्याची पत्नी 'सईबाई' पुरोगामी विचारसरणीची आहे. एकूण २२ व्यक्तिरेखा आहेत. तत्कालीन समाजाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या विविध वृत्ती, प्रवृत्तींचे दर्शन घडविणाऱ्या आहेत. मानवी जीवनाविषयी गंभीर

स्वरूपाचे मूल्यात्मक चिंतन केले आहे. विशिष्ट तत्त्व व मूल्यदृष्टी डोळ्यासमोर ठेवून भालेकरांनी लेखन केले आहे. चर्चात्मक कादंबरी लिहिणारे भालेकर हे पहिले लेखक ठरतात.

या कादंबरीचा आशय व विषय पूर्णत: वेगळा आहे. खेडेगाव, तेथील लोकांचे जीवन, शेती, शेतकरी, त्यांचे कष्ट, दारिद्र्य, पाटील-कुलकर्णी असे ग्रामजीवनाचे विविधांगी चित्रण या कादंबरीतून केले आहे. हे लेखन महात्मा फुले यांच्या सत्यशोधक समाजाच्या दृष्टिकोनातून झालेले आहे. धर्म म्हणजे काय? जाती कोणी तयार केल्या? जीवनसार्थक होण्यासाठी काय करावे? इ. गोष्टींची चर्चा केली आहे. जीवन सार्थकतेसाठी प्रमाणित मार्ग, ब्राह्मण भोजन, तीर्थयात्रा, पुराणग्रंथ इ. गोष्टींची चिकित्सा केली आहे. उदा. कुंभकर्ण कोण आहे? स्त्रियांचे प्रश्न मांडले आहे. या सर्वांवर म. फुले यांच्या विचारांचा प्रभाव जाणवतो.

एकूण कादंबरीचा विचार करता भाषा देशी निवेदन शैलीतून आकारास आली आहे. भालेकरांची भाषा रांगडी असली तरी तत्कालीन जनसामान्यांची बोली आहे. सामाजिकता व प्रबोधनात्मकता हे कादंबरीचे गुण आहेत. ही कादंबरी संवादात्मक आहे. संवाद व मोजके आटोपशीर आहेत. प्रसंगी म्हणी, वाक्प्रचार, जोडशब्द इ. वापर केला आहे. ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्रित करणारी ही पहिली ग्रामीण कादंबरी आहे.

**संदर्भ सूची :**


१) प्रा. सीताराम रायकर, संपा. 'कृष्णराव भालेकर समग्र वाङ्मय', महात्मा फुले समता प्रतिष्ठान, पुणे, प्रथमावृत्ती, पृ. ५०.

२) तत्रैव, पृ. ५३.

३) तत्रैव, पृ. ६९.

४) तत्रैव, पृ. ७४.

५) तत्रैव, पृ. १०१.

६) तत्रैव, पृ. ९१.

७) तत्रैव, पृ. १०४.

८) तत्रैव, पृ. १०२.

९) तत्रैव, पृ. १०८.

१०) तत्रैव, पृ. ९४.

११) तत्रैव, पृ. ९४.

१२) तत्रैव, पृ. ९४.

१३) तत्रैव, पृ. १०१.

१४) तत्रैव, पृ. १०१.

१५) तत्रैव, पृ. १०३.

१६) तत्रैव, पृ. १०३.

१७) तत्रैव, पृ. ८२.

१८) तत्रैव, पृ. ८८.

१९) तत्रैव, पृ. ८३.

२०) तत्रैव, पृ. ८९.

२१) तत्रैव, पृ. ८१.

२२) तत्रैव, पृ. ९७.

२३) तत्रैव, पृ. ५४.

२४) तत्रैव, पृ. ६५, ६६.

२५) तत्रैव, पृ. ६८.

२६) तत्रैव, पृ. १०८.

२७) तत्रैव, पृ. ८४.

२८) डॉ. आनंद यादव, 'ग्रामीणता : साहित्य आणि वास्तव', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, ६ मे १९८१, पृ. ११७.

२९) डॉ. राम गुंदेकर, 'सत्यशोधकी साहित्य परंपरा आणि स्वरूप', पद्मजी डॉ. डी. वाय. पाटील प्रकाशन, पुणे, जिजाऊ प्रकाशन, औरंगाबाद, मुंबई, पृ. १०५.

३०) 'रा. ना. चव्हाण निवडक वाङ्मय', संपा. प्रा. मो. नि. ठोके, पारख प्रकाशन, बेळगाव, १९८६, पृ. ५५९.

३१) डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, संपा. 'पाचोळा आणि दहा समीक्षक', (प्रस्तावना), साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती १९८०, पृ. १०.

३२) डॉ. रवींद्र ठाकूर, 'मराठी ग्रामीण कादंबरी', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २६ जानेवारी १९९३, द्वितीयावृत्ती, १ सप्टेंबर २००१, पृ. ५२, ५३.

३३) उनि 'कृष्णराव भालेकर समग्र वाङ्मय', पृ. ५२.

३४) सं. प्रा. चंद्रकुमार नलगे 'ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास', सुरेश नलगे एजन्सी, प्रथम आवृत्ती, सप्टेंबर १९९६, पृ. ११.